अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २८ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८





# विद्यार्थ्यांचे भवितव्य

शिंदे-फडणवीस सरकारने शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीत बदल करून पाचवी आणि आठवी या दोन इयत्तांसाठी घेतलेला वार्षिक परीक्षेचा निर्णय विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा आहे, असे शिक्षण क्षेत्रातील जाणकार सांगतात पण जे अध्यापनाचे कार्य करतात ती मास्तरमंडळी मात्र त्यावर बोलायला तयार नाहीत. शिक्षकांना अतिरिक्त काम नको आहे. केवळ मुलांसमोर पुस्तक वाचले, झाले शिकवण्याचे काम.आज ५५ वयोगटातील जी पिढी आहे, तिला चांगले ठाऊक असेल की, पूर्वी चौथी आणि सातवीसाठी बोर्ड परीक्षा असे. मुला-मुलींना घेऊन गुरूजीमंडळी परिसरातील गावात जात असत. परीक्षा ही गुणवत्तेचे मोजमाप आहे आणि ध्यास घेऊन विद्यार्थी अभ्यास करत असतात.पूर्वीची कडक शिस्त आज राहिली नाही. त्याला पालकही तितकेच जबाबदार आहेत. पूर्वी शाळेच्या प्रगती पुस्तकात 'पाल्यास वरच्या वर्गात घातले आहे/नाही' असा शेरा असायचा. तो गेली दहा वर्षे गायब झाला आहे. कारण या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता वरच्या वर्गात पाठवण्याची तरतूद शिक्षण हक्क कायद्यातच होती. तरीही शाळांकडूनच विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात असे. अर्थात शाळांना प्रत्येक विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करणे आवश्यक करण्यात आले होते. तरीही मुले 'नापास' न होता पुढे पुढेच जात राहिली. एकदम नववीच्या वार्षिक परीक्षेत त्याला उत्तीर्ण होण्याचे दडपण दिल्याने, त्याचा परिणाम त्यानंतरच्या वर्षी येणाऱ्या दहावीच्या परीक्षेत अधिक दिसणे स्वाभाविक होते. परीक्षा हे विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या तपासणीचे एक साधन असते. ते परिपूर्ण नसले, तरीही त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला आपण किती पाण्यात उभे आहोत, हे समजण्यास मदत होते. आपण कुठे कमी पडतो आहोत आणि कुठे अधिक प्रगती करण्यास वाव आहे, हे लक्षात येण्यास त्यामुळे काही प्रमाणात का होईना, मदत होते. शाळेत




आठवीपर्यंत उत्तीर्णच व्हायचे असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या दडपणाविना विद्यार्थ्यांना नंतरच्या आयुष्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या ताणांची, स्पर्धांची समजच येऊ शकत नसे. या परीक्षा पाचवी आणि आठवीसाठी पुन्हा सुरू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करताना अनुत्तीर्णांना पुन्हा एकदा संधी दिली जाणार असून त्यातही तो अनुत्तीर्ण झाल्यास त्या विद्यार्थ्याला त्याच वर्गात बसावे लागणार आहे. परीक्षा न घेण्याच्या निर्णयावर गेली अनेक वर्षे शिक्षण क्षेत्रातून उलटसुलट टीका होत होती. शिक्षण गुणवत्तापूर्ण असायला हवे आणि विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव देणारे असायला हवे, हे खरे असले, तरीही राज्यातील विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या, शाळांची, शिक्षकांची आणि शैक्षणिक वातावरणाची परिस्थिती पाहता 'प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्याला मदत करणे' ही स्वप्नवत वाटणारी गोष्ट ठरते. शिक्षणाच्या मुळाशी विद्यार्थ्यांमधील कुतूहल वाढवून, त्याला शिकण्याची, नवे काही समजून घेण्याची इच्छा निर्माण करण्याचे तत्त्व असायला हवे. पाठ्यपुस्तकांच्या बाहेर कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत पोहोचलेल्या माहितीच्या जगात विद्यार्थ्यांना संकल्पना किती आणि कशा समजल्या ते पाहणे एवढाच परीक्षेचा हेतू असायला हवा. त्यामुळे पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला आठवीपर्यंत अनुत्तीर्ण व्हावे लागत नाही. पण याच इयत्तांमधील मुलांच्या गुणात्मक संपादणुकीची पाहणी करून प्रथम संस्थेतर्फे सादर होणारे 'असर'चे अहवाल पाहिले, तर भाषेची ओळख, वाचनक्षमता, अंकओळख या अगदी प्राथमिक पातळीवरही किती अंधार आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. नापास हा शिक्का कपाळी घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय असतेच, परंतु ऐंशी-नव्वद टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही योग्य अभ्यासक्रमासाठी तीव्र स्पर्धेला सामोरे जावे लागते. बारावीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या प्रवेश परीक्षेत अत्युत्तम गुण मिळणे हेच जर शिक्षणाचे ध्येय असेल, तर शिक्षणातील सर्वसमावेशकतेला अर्थ उरत नाही. त्यामुळे कौशल्यांपासून ते प्रत्यक्ष ज्ञान संपादनापर्यंतचा विद्यार्थ्यांचा प्रवास नेहमीच खडतर राहतो. विद्यार्थ्यांमध्ये असलेला परीक्षेच्या भीतीचा अडसर दूर करणे, हे यापुढील काळातील खरे आव्हान असणार आहे. सद्य:स्थितीतील परीक्षा पद्धतीला पर्याय शोधताना, परीक्षा हे संकट वाटणार नाही, याचा विचार प्राधान्याने व्हायला हवा. शिक्षण ही आनंददायी व्यवस्था असायला हवी, हे खरे. मात्र मूल्यमापन हे शिक्षणयंत्रणेचे काम आहे, निव्वळ परीक्षार्थी न घडवता मूल्यमापनातून स्वत:ला ओळखू लागलेले विद्यार्थी तयार होतील, याची खबरदारी घेतली गेली नाही, तर सोळा लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य नंतरच्या काळातही अधांतरीच राहील, हे लक्षात घ्यावे लागेल.

---

आषाढी वारीनिमित्त

# देवतांच्या तेजाचा उत्सव !

आषाढी एकादशी, देवशयनी एकादशी ही हिंदू पंचांगातील एक तिथी आहे. हा वारकरी सांप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आहे. वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी, भक्त पंढरपूरमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. आध्यात्मिक व धार्मिक दृष्टिकोनातून या दिवसाला खूप महत्त्व आहे. या दिवशी देव निद्रिस्त होतात अशी समजूत आहे. हिंदू पंचांगाप्रमाणे प्रत्येक महिन्यात दोन पक्ष पंधरवडे असतात. त्यामुळे दोन तिथ्या असतात. एक शुद्ध तिथी आणि एक वद्य तिथी. म्हणून आषाढ महिन्यात एकादशी दोनदा येते. आषाढ शुद्ध एकादशी आणि आषाढी वद्य एकादशी. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला देवशयनी आषाढी एकादशी म्हणतात तर आषाढ वद्य एकादशीला कामिका एकादशी म्हणतात.



प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला 'एकादशी' म्हटले जाते. चांद्रमास गणनेतील फरकामुळे तिथीची वृद्धी झाल्यास स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात, त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी 'स्मार्त' व दुसऱ्या दिवशी 'भागवत' असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात 'स्मार्त' आणि 'भागवत' अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या स्मार्त एकादशीला नाव असते, परंतु भागवत एकादशीला नाव नसते. अधिक मास आल्यास अधिक महिन्याच्या आणखी दोन एकादशी येतात. अधिक महिन्यात येणाऱ्या दोन्ही एकादशांना 'कमला एकादशी' हेच एकमेव नाव असते. अशा वेळी निज महिन्यातील तिथी ग्राह्य धरली जाते. देवशयनी एकादशीबद्दल असे मानले जाते की या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात (एक वैश्विक महासागर) शेषनागावर झोपी जातात. धार्मिक मान्यतेनुसार मनुष्याचं एक वर्ष हे देवांची एक अहोरात्र असते. दक्षिणायन ही देवांची रात्र असते.

आषाढी एकादशीच्या व्रतामध्ये सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते असा समज आहे. म्हणून सर्व व्रतांमध्ये आषाढी एकादशीच्या व्रताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पंढरपूरला अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा पुरावा मिळतो तसेच वैकुंठभूमीच्या आधीपासूनच पंढरपूर अस्तित्वात आले असा लोकांचा समज आहे. म्हणूनच पृथ्वीवरील सर्वात पुरातन अशा तीर्थक्षेत्राचा पंढरपूर असा उल्लेख केला गेला आहे. आषाढ महिन्यातील कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायनाला सुरुवात होते. म्हणून आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी एकादशी किंवा हरिशयनी एकादशी' असे म्हटले जाते. यानंतर भगवान विष्णू कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला म्हणजेच प्रबोधिनी एकादशीला जागे होतात. हा काळ चतुर्मास (चार महिने) म्हणून ओळखला जातो आणि हा पावसाळ्यासोबतच असतो. शयनी एकादशी म्हणजे चातुर्मासाची सुरुवात. या दिवशी विष्णूला प्रसन्न करण्यासाठी उपासना आणि उपवास केले जातात. पंढरपूरचा विठोबा हा अवघ्या महाराष्ट्राचे दैवत असून आषाढी एकदशीला इथे वारकऱ्यांचा मोठा मेळा भरतो. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ठिकठिकाणाहून लाखो भाविक लोक विठ्ठलनामाचा गजर करीत आषाढी एकादशीला पायी चालत येतात. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढीला या दिवशी पंढरपुरास शेगाव येथून संत गजानन महाराजांची, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वराहून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, एदलाबाद येथून मुक्ताबाई यांची तर उत्तर भारतातून कबिरांची पालखी येते.

**आषाढी एकादशीचे व्रत :** आषाढी एकादशीला व्रत-उपवास करण्याची पद्धत आहे. काही लोक निर्जळ तर काही उपवासाचे पदार्थ खाऊन व्रत ठेवतात. एकादशीच्या आदल्या दिवशी अर्थात दशमीच्या दिवशी एकभुक्त राहून एकादशीला पहाटे उठून स्नान करून तुळस वाहून विष्णूपूजन करावे. हा संपूर्ण दिवस उपवास करावा. रात्री हरिभजन करीत जागरण करावे. विठ्ठलनामाचा जयघोष करीत संपूर्ण दिवस देवाच्या नामस्मरणात घालवावा. आषाढ शुद्ध द्वादशीला वामनाची पूजा करून पारणे सोडावे. या दोन्ही दिवशी विष्णू देवाची पूजा करून अहोरात्र तुपाचा दिवा लावावा.

**आषाढी एकादशी महात्म्य कथा :** एकेकाळी भगवान शंकर यांनी प्रसन्न होत मृदुमान्य नावाच्या राक्षसाला इतर कोणाकडूनही न मरता केवळ एका स्त्रीच्या हातून मरशील असा वर दिला होता. या वरामुळे मृदुमान्य हा राक्षस खूपच उन्मत्त झाला आणि त्याने आपल्याला कोणतीही स्त्री मारू शकत नाही, असा मनात विश्वास ठेवत देवांवर स्वारी केली. त्यामुळे अन्य देवांनी शंकराकडे मदतीसाठी धावा केला, पण वर दिल्यामुळे शंकर भगवान यांनाही काहीही करता येत नव्हते, पण त्याचवेळी देवाच्या श्वासातून एक देवी निर्माण झाली आणि तिने मृदुमान्य राक्षसाला ठार केले. तसेच या मंगलमय दिवशी तुफान पाऊस पडत असल्याने सर्व देवतांना स्नानही घडले. तसेच सर्वजण राक्षस मरेपर्यंत गुहेत लपून राहिल्याने या दिवशी त्यांना पूर्ण दिवस उपवास घडला होता. या देवीचे नाव होते एकादशी आणि त्यामुळेच या दिवशी एकादशीचा उपवास करण्याचा प्रघात पडला. शास्त्र आणि वेदानुसार जी व्यक्ती या दिवशी भगवान विष्णूसह एकादशी देवीची मनोभावे उपासना करते, त्यांना पापातून मुक्तता मिळते असा समज आहे. तसेच उत्तरोत्तर प्रगतीसाठी आषाढी एकादशीची उपासना कामी येते असाही समज आहे. या दिवशी दुपारी आणि रात्री भोजनात उपवासाचे विशेष पदार्थ सेवन केले जातात. यासाठी राजगिरा, साबुदाणा, बटाटा, रताळे, वरई, शेंगदाणे यापासून तयार केलेले पदार्थ सेवन केले जातात.

**- मानसी सावर्डेकर.**

### आरती विठ्ठलाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा  
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।  
पुण्डलिकाचे भेटि परब्रह्म आले गा  
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।।  
जय देव जय देव जय पांडुरंगा।  
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा।।धृ०।।  
तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी  
कासे पीताम्बर कस्तुरी लल्लाटी।  
देव सुरवर नित्य येती भेटी  
गरुड हनुमन्त पुढे उभे राहती।।२।।  
धन्य वेणूनाद अणुक्षेत्रपाळा  
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा।  
राई रखुमाबाई राणीया सकळा  
ओवाळिती राजा विठोबा सावळा।।३।।  
ओवाळू आरत्या कुरवण्ड्या येती  
चन्द्रभागेमाजी सोडुनिया देती।  
दिण्ड्या पताका वैष्णव नाचती  
पण्ढरीचा महिमा वर्णावा किती।।४।।  
आषाढी कार्तिकी भक्तजन येती  
चन्द्रभागेमाजी स्नाने जे करिती।  
दर्शन होळामात्रे तया होय मुक्ति  
केशवासी नामदेव भावे ओवाळिती।।५।।

---


टुडेज् ब्लॉग

पंढरीची वारी हळूहळू पांडुरंगाच्या दिशेने मार्गक्रमण करीत असताना या वारीतल्या प्रत्येक वारकऱ्याला आस लागलेली असते ती सावळ्या विठ्ठलाचे समचरण पाहण्याची, या वारीदरम्यान प्रत्येक वारकऱ्याचा विठ्ठल झालेला असतो, त्याच्या नसानसात आणि रक्ता रक्तात फक्त त्या विठ्ठलाचा नाम गजर घुमत असतो. या विठ्ठलाच्या नामाचे वेड प्रत्येक वारकऱ्याला संपूर्ण आयुष्यभर लागलेले असते, वारकरी संप्रदायातल्या प्रत्येक संतांनी आपल्या परीने विठ्ठलाचे केलेले वर्णन हे जरी वेगवेगळे असले तरी आशय मात्र एकच असतो.

संतांच्या प्रतिभेचे ज्ञानवंतांच्या प्रज्ञेचे तर लोकजीवनाच्या श्रद्धेच प्रतिष्ठान म्हणजे पंढरीचा पांडुरंग होय ज्ञानावंतंच ज्ञान दर्शन आणि सामान्यांचे भावदर्शन जिथे एकवटत तो म्हणजे पांडुरंग. विटेवरचं पांडुरंगाच सावळे रूप संतांना एवढे भावले की त्यांनी आपली सारी शब्दसंपदा विठ्ठलाच्या चरणी अक्षरशः वाहून दिली, संतांच्या वाङ्ममय रचनेचे दोन भाग पडतात पहिला म्हणजे प्रबंध रचना आणि दुसरा म्हणजे गाथा रचना. प्रबंध रचना ही एखादा तत्व चिंतनाचा विषय घेऊन त्यावर क्रांतिक पद्धतीने केलेली मांडणी होय तर गाथा रचना हा अंतर्मनाचा मुक्त आविष्कार असतो.

## ।। आवडे हे रूप गोजिरे सगुण ।।

विठ्ठलाच्या गुणसंकीर्तनांचा वेध घेत त्याच्या स्वरूपाच्या आणि गुणाचा अविष्कार हा संतांच्या वाङ्मयातून आपल्याला पाहायला मिळतो, विश्वातील लावण्यच आर्त झालं, पांडुरंगाचे ठायी एकवटलं आणि असं विश्वसौंदर्य मूर्त रूपात उभा राहिलं की ज्याच्या प्रभेने संपूर्ण विश्व सौंदर्यमय होतं असं प्रासादिक लावण्याच सौंदर्य रूप म्हणजे श्री विठ्ठल... संपूर्ण पंढरीच्या वारीमध्ये ते वारकऱ्यासोबत स्वतः विठ्ठल देखील सहभागी झालेला असतो अशी वारकऱ्यांची धारण आहे जेव्हा त्याचा भक्त प्रेमाने भजन गात त्याला भेटायला निघतो तेव्हा भगवंतही आपले राऊळ सोडून या भजन यात्रेत स्वतः सहभागी होतो वारकऱ्याच्या त्या भजना बरोबर भगवंतही बोलून स्वानंदाने त्याच्याबरोबर चालू लागतो वारकऱ्यांसमवेत भगवंताचे चालणे हेच भगवंताचे आनंद निदान आहे.




जेथे स्वानंद कंद गोविंद भक्ती प्रेमानेच एक एक पाऊल पुढे टाकतो तिथे विधी निषेधाचा शिरकाव तरी कसं होईल विधेनिषदांच्या पलीकडे नेणारी ही वाटचाल म्हणजे भागवत धर्माच्या म्हणजेच वारकरी संप्रदायाच्या एकात्मतेचा एक विराट आविष्कार असतो, भक्ताने देवासाठी नाम गजर करीत चालावे हे स्वाभाविक आहे पण देवाने देव पण विसरून वारकऱ्यांच्या समवेत चालावे हे अलौकिक आहे वारकरी संप्रदायाचा हा मार्ग देवभक्तांनी एकत्रित चोखळलेला मार्ग आहे या मार्गावरून चालताना वारकरी देहात राहूनही देहातीत होतो देह धर्माचा अंकुर त्याच्यात उठत नाही ज्ञानगर्माचा ताठा त्याला जडत नाही सहज भजनामध्ये तो एक एक पाऊल पुढे टाकतो त्याच्या देह स्वभावाची लक्षणे त्या विठ्ठलाच्या चरणी अर्पण होतात. त्याच्या चालण्याच्या कृतीतही आत्मसमाधीची अनुभूती असते कारण तो ज्या मार्गावरून चालतो तो मार्गच पांडुरंग मार्ग झालेला असतो पंढरीच्या वारीतील वारकरी या मार्गाचा अधिकारी ठरतो... या पांडुरंगाचे वेर्णन करताना ज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण ! नाही रूप वर्ण गुण जेथे, ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निज्यजोती ! ते हे उभी मूर्ती विटेवरी

**- धनंजय दीक्षीत.**

---

जन्म हा अखेरचा

## कायार्पितस्थल



अशी अद्भूत रचना त्याने केली आहे. मातेच्या गर्भात तिळाएवढा जीव मूळ धरतो आणि हळूहळू त्याला आकार येतो. हे काही मानवी कर्तृत्व नव्हे. स्त्री आणि पुरुष या निर्मितीची फक्त माध्यमे असतात, हे विचार केला तर लक्षात येते. शरीरेही असंख्य आणि त्यांची चेहरेपट्टी आणि ठेवण परस्परांपासून भिन्न. कारखान्यातून एकासारख्या एक मोटारींचे उत्पादन व्हावे तशी एका छापाची ही निर्मिती नाही. गाडीचा नंबर पाहिल्याशिवाय तिचे वेगळेपण कळू शकत नाही. परंतु एकसारखा एक मनुष्य असत नाही. एकाच मातृगर्भातून जन्म घेतलेल्या मुलांची चेहरेपट्टी वेगवेगळी असते. इथे डुप्लीकेट काही नसते. असा हा विलक्षण निर्माता आहे.

शरीर हे भगवंताने निर्माण केले. ते त्याचे आहे. म्हणूनच ते त्याला अर्पण केले पाहिजे. हेच कायार्पण होय. भगवंताने आपल्याला शरीर दिले हे ठीक आहे. मग ते त्याला अर्पण तरी का करायचे? तर यासाठी करायचे की तुम्हाला भगवंत व्हायचे आहे. भगवंताने दिलेले शरीर भगवंताला अर्पण करायचे असते. नदीतील पाणी घेऊन ते नदीलाच अर्पण करावे, त्याप्रमाणे. सर्व प्रपंच त्या ईश्वराचा आहे. म्हणून काहीही अर्पण केले तरी ते त्याचेच असणार. अर्पण केल्याने आपल्या मनात समर्पणभाव आणि उदारभाव उत्पन्न होतो. आई लहान मुलाला खाऊ देते आणि गंमतीने 'त्यातला थोडा मलाही दे' असे म्हणते. मूल उदार असेल तर आईला देईल. कंजूष असेल तर देणार नाही. खाऊ आईनेच थोड्या वेळापूर्वी दिलेला आहे. तरी तो द्यायला मूल नाखूश असते. तुम्हाला परमेश्वराने शरीर दिले त्याला किती वर्षे होऊन गेली? कुणाला चाळीस, कुणाला पन्नास, कुणाला सत्तर. इतकी वर्षे शरीराचा उपभोग घेऊन देखील ते परत करायला आपण राजी नसतो. परंतु ते परत केलेच पाहिजे. शरीर भगवंताला अर्पण करण्यात तुमचाच लाभ असतो. आईने खाऊ मागितल्यावर जर मुलाने दिला तर आई तो खात नसते, मोठ्या प्रेमाने त्यालाच परत करते. म्हणून तर ती आई असते. भगवंत आपला मायबाप आहे. त्याने दिलेले शरीर त्याला परत करण्यात आपलाच फायदा होतो. शरीरार्पण केल्यावर भगवंत काय देतो हे पुढील श्लोकात सांगतात.


**यदा योगी निजं देहं शिवाय विनिवेदयेत् । तदा भवति तद्रुपं शिवरुपं न संशय: ।।१७.३५।।** शिवयोगी आपले शरीर शिवार्पण करतो. तेव्हा तो स्वत: शिवस्वरुपच होतो. कापरने स्वत:ला अग्नीत अर्पण केल्यावर तो अग्नीरूप होतो त्याप्रमाणे. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

## आर्थिक उदारीकरणाचे जनक

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरुवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी. व्ही. नरसिंहराव यांची आज १०२ वि जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलुगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात 'वंदे मातरम्' हे गीत गाण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थीदशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत



काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना 'फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स' असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

---

# नामा वारकरी आणि पांडुरंग

पंढरीची वारी दिसा मागून दिस पुढे पुढे सरकत आहे. वारीतील वारकऱ्यांना केव्हा एकदा पांडुरंगाचे दर्शन घेतोय आणि मन तृप्त होतेय असे झाले आहे. रोज सकाळी उठायचे, चहा-पाणी प्यायचे आणि पंढरीची वाट चालायची. ज्ञानबा-तुकाराम, ज्ञानबा-तुकारामचा गजर करायचा. त्या नामाच्या गजरामध्ये पुढच्या मुक्कामाचे गाव केव्हा व कसे आले, हे कळत देखील नसायचे. दिवसभर पंढरीची वाट चालायची आणि रात्र झाली की मग मुक्कामाच्या ठिकाणी अंग टाकून द्यायचे. मग झोप कशी लागते? हे कळायचे देखील नाही. तीच खरी सुख निद्रा होय.

या सर्व वारकऱ्यांमध्ये नामा वारकरी पण होता. तो पण या सर्वांच्या बरोबर वारीला होता. नामा वारकरी अगदी दंग होऊन 'ज्ञानबा-तुकाराम' चा गजर करायचा. सकाळचा चहा-पाणी, दुपारचे जेवण आणि संध्याकाळ झाली की कुठेतरी मुक्काम करायचा. असाच एका ठिकाणी रात्रीच्या वेळी नामा झोपला असता, प्रत्यक्ष देव पांडुरंग यांना नामदेवाची आठवण झाली. पांडुरंगांना वाटले की आपण नामाची भेट घ्यावी. पृथ्वीतलावर कशी काय हालहवा चालली आहे? ती तरी पहावी, असा विचार करून पांडुरंग नामाच्या स्वप्नात आले. त्यांनी नामाला हाक मारली.

पांडुरंग :- नामा ऽऽ, काय चाललंय रे तुझं? कसा आहेस रे तू?

नामा दचकून पाहतो (स्वप्नात), देव पांडुरंग समोर उभे आहेत. हे पाहून नामा नमस्कार करतो व म्हणतो.

**नामा :-** देवा पांडुरंगा, आली वाटतं माझी आठवण. या सर्व वारीमध्ये मी एकटाच आहे की मला पांडुरंगाचे दर्शन होत आहे. नमस्कार करतो देवा. इकडील सर्व ठीक आहे देवा. यावर्षी आषाढीच्या यात्रेला लई मायंदाळ लोक येणार आहेत बघा. दरवर्षी दहा लाख ते बारा लाखांची यात्रा भरत असे. पण यावर्षी मात्र हा आकडा चौदा लाखापर्यंत जाईल असेच वाटते मला व तसेच शासकीय अधिकाऱ्यांचाही तोच अंदाज आहे देवा.

**पांडुरंग :-** अरे खरंच आहे नामा तुझे. थोडा तरी विचार कर जरा. आपल्या मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी नाही का महिलांना ५० टक्के एसटीमध्ये सवलत दिली व ज्येष्ठांनाही मोफत एसटीच्या प्रवासात सवलत दिली. त्यामुळे यावर्षीच्या आषाढी यात्रेत लोकांच्या गर्दीचा मोठा उच्चांक होण्याची दाट शक्यता असणारच.

नामा :- नाहीतरी देवा, आपल्यावर गोरगरीब, श्रीमंत अशा सगळ्याच थरातील लोक मोठ्या अपारश्रद्धेने भक्ती भाव करतात. आपली कृपा दृष्टी सर्वांनाच हवी असते. हे पाहून आपले प्रशासन देखील अगदी कंबर कसून वारकऱ्यांच्या सोयीसाठी उभे ठाकले आहे. वारकऱ्यांसाठी वारीच्या मार्गावर अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पिण्यासाठी थंड पाण्याची सोय शासनाने व काही स्वयंसेवी संस्थांनी केली आहे, तसेच काही स्वयंसेवी संस्थांनी व कारखानदारांनी वारकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था केली आहे. तसेच शासनाने उघड्यावरती कोणालाही शौच करण्याची पाळी येऊ नये, म्हणून तात्पुरत्या स्वरूपातील शौचालयाची उभारणी वारीच्या मार्गावर केली आहे. त्यामुळे वारकऱ्यांना कुठल्याही प्रकारची गैरसोय वारीच्या काळात होणार नाही असे वाटते.

**पांडुरंग :-** नामा नामा, हे खरंच आहे. आपल्या शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी व त्यामध्ये काम करणारे भक्त व तसेच कारखानदारांनी वारकऱ्यांच्या सोयीसाठी सुविधा उपलब्ध करून देऊन मोठे पुण्य कर्म केले आहे. माझे त्यांना फार मोठे आशीर्वाद आहेत.

**नामा :-** देवा, आता आणखी एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटतेय देवा.

**पांडुरंग :-** कोणती रे नामा?

**नामा :-** देवा पांडुरंगा, दरवर्षी ठरल्याप्रमाणे यावर्षी पण आपल्या महापूजेला मुख्यमंत्री येणार आहेत. त्यांची शासकीय महापूजा ठरल्याप्रमाणे पहाटे अडीच वाजल्यापासून पहाटे पाच वाजेपर्यंत चालत असते आणि त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्काराचा कार्यक्रम



होत असतो. म्हणजे सुमारे चार तास हा कार्यक्रम चालू असतो. या चार तासांमध्ये वारकऱ्यांचे देवदर्शन व मुखदर्शन आजपर्यंतच्या काळात बंद ठेवण्यात येत होते. परंतु यापुढे तसे होणार नाही देवा. यावर्षीपासून आषाढी सोहळ्याच्या इतिहासात पहिल्यांदाच शासकीय पूजा चालू असताना व पुढे सत्कार कार्यक्रम चालू असतानाही वारकऱ्यांचे देवदर्शन व मुखदर्शन चालूच राहणार आहे. त्यामुळे वारकऱ्यांना दर्शन रांगेत चार तास यापूर्वी जे उभे राहावे लागत असे ते आता बंद होणार आहे. त्यामुळे वारकऱ्यांची एक फार चांगली सोय होणार आहे. त्यांचा चार तासाचा वेळ जो दरवर्षी वाया जात होता, तो आता जाणार नाही देवा. त्या चार तासाच्या काळात जवळपास दीड ते दोन लाख भाविकांना देवाचे मुखदर्शन होणार आहे. माननीय मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी यावर्षीपासून हा नवीन पायंडा पाडला आहे आणि तो सर्वांच्याच सोयीचा आहे देवा. आपल्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी ही या गोष्टीला दुजोरा दिला आहे देवा!

**पांडुरंग :-** वा वा वा ! नामा फारच छान. आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांची महापूजा सुरू असताना देखील वारकऱ्यांना देवदर्शन व मुखदर्शन देण्याचा निर्णय फारच योग्य आहे. मला फार फार आनंद होत आहे, हे पाहून. त्यामुळे वारकऱ्यांचा अमूल्य वेळ वाया जाणार नाही व शारीरिक त्रासही कमी होणार आहे. हे पाहून मी अगदी सर्वांवरच प्रसन्न झालो आहे. सर्वांना माझे खूप खूप आशीर्वाद ! तथास्तु !! आणि देव निघून जातात.

**(काल्पनिक)**

**- अनिल जाधव, बार्शी.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## विनायक नगर येथे गळफास घेऊन आत्महत्या

CRIME

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील माळी विनायक नगर येथे राहणाऱ्या शरणप्पा चंद्रकांत नंदवाड (वय ३६) या इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना सोमवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. काल रात्रीच्या सुमारास शरणप्पा नंदवाड याने राहत्या घरातील छताच्या लोखंडी रॉडला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून ओळखीच्या लोकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

**भारत नगर येथे महिलेस मारहाण; फिनेल प्राशन**

मुळेगाव रोडवरील भारत नगरात राहणाऱ्या मुनेरा इमरान पठाण (वय ३०) या महिलेने फिनेल प्राशन केली . ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या घराशेजारी राहणारे याकूब मुल्ला, रेश्मा मुल्ला,जोहरा मुल्ला आणि त्यांच्या साथीदारांनी घरात घुसून मारहाण केली होती. त्याचा राग अनावर झाल्याने त्याने फिनेल प्राशन केली. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.



# मोहोळच्या पोपटाला, मी काय चीज ते उद्यापासून दाखवतो

## ‘बीआरएस‘च्या गृहप्रवेशानंतर भालकेंनी दिला खणखणीत इशारा

✔ सुराज्य/पंढरपूर

पंढरपूरच्या राजकीय व सहकार क्षेत्रातील एक युवा नेते भगीरथ भारत भालके यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह मंगळवारी तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव ऊर्फ केसीआर यांच्या उपस्थितीत भारत राष्ट्र समिती अर्थात बीआरएस पक्षात प्रवेश केला.राजकीय गृहप्रवेश होताच भालकेंनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना एकप्रकारे सज्जड दम भरला.भालके काय चीज आहे हे मोहोळच्या पोपटाला दाखवून येतो, असा खणखणीत इशारा दिल्यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात मोठी खळबळ माजली आहे.




भालके यांच्या सरकोली या मायभूमीत केसीआर यांच्या उपस्थितीत बीआरएसचा मेळावा पार पडला. त्यावेळी भालकेंनी बीआरएस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर त्यांचे आक्रमक शैलीत भाषण झाले.

ते म्हणाले की, काल एक मोहोळचा पोपट इथे येऊन खूप बोलून गेला. पण आजच्या उत्साहाच्या प्रसंगी काय बोलणार नाही. भालके काय चीज आहे ते या पोपटाला उद्यापासून दाखवतो, असा इशारा भालकेंनी राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांचे नाव न घेता दिला. सकाळी विठ्ठल दर्शनानंतर केसीआरसह सर्व मंत्री, आमदार खासदार भालके यांच्या सरकोली येथे उपस्थित राहिले. या पक्ष प्रवेशावेळी पंढरपूर- मंगळवेढा मतदारसंघातील हजारो भालके समर्थकांची उपस्थिती लक्षवेधी होती. तेलगंणामध्ये शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजना अतिशय चांगल्या आहेत. शेतकऱ्यांना विमा, वारसांना मदत, अवजारांसाठी मदत, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, दिली जाते. २०१४ ला हे राज्य निर्माण झाले आणि अवघ्या ९ वर्षांत त्यांनी राज्याचा विकास केला. महाराष्ट्रात कोणत्याही सरकारने शेतकऱ्यांना काहीच दिले नाही. महाराष्ट्रातील शेतकरी दिवसा वीज मागत आहे, पण तीही दिली जात नाही. दलित बांधवांना व्यवसाय करण्यासाठी १० लाख रुपयांची मदत केली जाते, असे एक उदाहरण भालकेंनी यावेळी दिले.

### इथेच बिनसले...

भगिरथ भालके हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते.त्यांनी पक्षाचे काम नेटाने सुरू ठेवले होते परंतु शरद पवारांच्या एका खेळीने सारे भिनसले. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शरद पवार यांनी पक्ष प्रवेश दिला.त्यानंतर भगीरथ भालके गटात अस्वस्थता पसरली. तसेच शरद पवार यांनी अभिजीत पाटील यांना पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची उमेदवारीचे संकेत जाहीर केले होते.पवारांची ही नीती भालकेंना सहन झाली नाही.दरम्यान सोलापूरवर डोळा ठेवलेल्या केसीआरनी ही संधी साधून भालकेंना बीआरएसच्या पायघड्या घातल्या. भालकेंच्या या भूमिकेमुळे पंढरपूरच्या राजकारणाला वेगळी कलाटणी मिळेल, असे दिसते.

### काय म्हणाले होते, उमेश पाटील?

भगीरथ भालके हे विधानसभेला कसे निवडून येतात, तेच आम्ही बघतो, असा थेट इशारा उमेश पाटील यांनी दिला होता. भगीरथ भालके यांच्या बीआरएस पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची सोमवारी पंढरपुरात बैठक झाली. या बैठकीत बोलताना पाटील बोलत होते. भगीरथ भालके हे विधानसभेसाठी लागणाऱ्या खर्चाच्या यंत्रसामुग्रीच्या लालसेपोटी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून बीआरएस पक्षात गेले आहेत. त्यांच्यामुळे राष्ट्रवादीवर कोणताही परिणाम होणार नाही, असेही त्यांनी म्हंटले होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जनसेवा हीच ईश्वरसेवा !

कल्याण
167-41-344

## आठ दिवसांतून एकदा पाणी, शेतकऱ्यांना वीज नाही, मग विकास कसला?

### मुख्यमंत्री केसीआर यांचा शिंदे-फडणवीस सरकारला सवाल



✔ सुराज्य/पंढरपूर

**केसीआर यांच्या भाषणातील प्रमुख मुद्दे -**

- बीआरएस महाराष्ट्रात प्रवेशामुळे इतर पक्षात भीतीचे वातावरण आहे.
- महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाने विकास केला नाही.
- बीआरएस ही शेतकऱ्यांची टीम आहे, कोणत्याही राजकीय पक्षाची टीम नाही
- सोलापूरमध्ये ८ दिवसांपासून एकदा पाणी येते, मग विकास कसला झाला, असा प्रश्न केसीआर यांनी उपस्थित केला.
- बीआरएस हा तेलंगणा आणि महाराष्ट्रापुरता मर्यादित पक्ष नाही
- महाराष्ट्रात वीज कंपन्यांचे खासगीकरण का केले?
- शेतकऱ्यांना वीज का मिळत नाही? असा सवाल देखील केसीआर यांनी उपस्थित केला.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विमा योजना का नाही, आम्ही विमा योजना दिली. महाराष्ट्रात शेतकरी एकत्र होत नाही तोपर्यंत काही बदलणार नाही. पक्ष येतील आणि जातील.

महाराष्ट्रात आठ दिवसातून एकदा पाणी दिले जाते. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळाले नाही तेव्हा महाराष्ट्राचा हा कसला विकास? असा सवाल तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी पंढरपूरच्या मेळाव्यात बोलताना शिंदे- फडणवीस सरकारला विचारला.

पंढरपूरमधील भगीरथ भालके यांच्या सरकोली या गावात मंगळवारी बीआरएस पक्षाचा मेळावा पार पडला. त्यावेळी राव बोलत होते. त्यांनी आपल्या भाषणात शिंदे- फडणवीस सरकारला टार्गेट केले. तेलंगणासारख्या योजना महाराष्ट्रात दिल्यास शेतकरी दिवाळी साजरी करतील, सरकारने जर तेलंगणाच्या योजना महाराष्ट्रात लागू केल्यास माझे दौरे थांबवीन, असे स्पष्ट करून राव पुढे म्हणाले की- बीआरएसच्या महाराष्ट्रात येण्याने राजकीय पक्षात भीतीचे वातावरण तयार झाले आहे.

बीआरएस हा पक्ष तेलंगणा महाराष्ट्र पुरता मर्यादित नसून देशभर काम करणार आहे. बीआरएस कोणत्या राजकीय पक्षाची टीम नाही तर शेतकऱ्यांची टीम आहे. कष्टकऱ्यांनी महाराष्ट्रात बीआरएसचे सरकार आणावे.





## दिव्यांग अव्यंग विवाहित जोडप्यांना धनादेशाचे वाटप

**सोलापूर** : सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनानुसार आंतरजातीय विवाहाच्या धरतीवर दिव्यांग अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन पर देण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील दहा पात्र लाभार्थ्यांना सुनिल खमितकर जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप करण्यात आले. या.वेळी सुनिल खमितकर यांनी दिव्यांगांना विविध योजनेचा लाभ देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा आमचा प्रयत्न राहील . असे मार्गदर्शन करताना सांगितले .व दिव्यांग जोडप्यांना पुढील वैवाहिक जीवनासाठी. प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा धनादेश देऊन पुढील भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी दिव्यांग विभागाचे सच्चिदानंद बांगर, शशिकांत ढेकळे उपस्थित होते.कार्यक्रमासाठी कमलाकर तिकटे, सुरेश भोसले आधी उपस्थित होते.



## लोकमंगल पतसंस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**मोडनिंब** : लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर शाखा-मोडनिंबच्या वतीने १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.दहावी वबारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवणाऱ्या समीक्षा सुर्वे, गायत्री मोरे, आदित्य माळी, मुस्कान बागवान, स्रुष्टी माळी या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या सल्लागार सौ शर्मिला कोळी, प्रेमनाथ म्हेत्रे, ईश्वर राऊत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी शाखेचे शाखाधिकारी समाधान वसेकर, सर्व स्टाफ व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विकास जाधव, विकास माळी, नितीन पडदुणे यांनी परिश्रम घेतले.



## मुंडफणेवाडी जि.प. शाळेत बालदिंडी

**श्रीपूर** : मुंडफणेवाडी महाळुंग शाळेत बाल दिंडी सोहळा उत्साहात साजराचा करण्यात आला. यावेळी शाळेतील चिमुकले विठ्ठल, रुक्मिणी, माऊली, मुक्ताई, तुकाराम महाराज,सोपान देव निवृत्तीनाथ अशा वेगवेगळ्या संतांचे वेशभूषा परिधान करून आले होते. सर्व मुलं व मुली यांनी वारकरी पोशाख परिधान केला होता. त्यामुळे सर्व वातावरण पालखीमुळे झाले होते. यावेळी शाळेसमोरून महिपती महाराजांची पालखी जात असते त्या सर्व वारकऱ्यांना शाळेच्या वतीने मुलांनी घरून आणलेली भाकरी व मिरच्यांचा ठेचा देण्यात आला. हा पालखी सोहळा व्यवस्थित पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक समीर लोणकर व सहशिक्षिका अर्चना वाघ तसेच अंगणवाडी सेविका रेखा मुंडफणे व मदतनीस सोनाली मंडले यांनी परिश्रम घेतले.



## खंडाळी हायस्कूलची बालदिंडी उत्साहात

**वेळापूर** : ज्ञानगंगा बालविकास मंडळ खंडाळी ता. माळशिरस संचलित , पार्वतीबाई ननवरे हायस्कूल खंडाळी व सन्मती प्राथमिक विद्यालयाच्या बालदिंडीचे आयोजन मुख्याध्यापक नानासाहेब वाघमोडे यांच्या सहकार्याने कलाशिक्षण शरद भोसले यांनी केले होते. बाल दिंडीमध्ये ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संस्थाध्यक्ष, माजी उपसरपंच सुभाष गांधी व गांधी परिवाराने बालदिंडीचे गावात स्वागत करून पूजा केली.बालदिंडीतील ३०० विद्यार्थ्यांनाश्री संत संतराज महाराज पालखी सोहळ्यास अन्नदान करणारे शितोळेताई व पाटबंधारे विभागाचे कर्मचारी यांच्यावतीने महाप्रसाद देण्यात आला. शिवछत्रपती भजनी मंडळ भोसलेनगरचे विठ्ठल भोसले यांनी मृदंग वाजविला .प्रशालेच्या लतिका गोरे, वर्षा पताळे, रुक्साना तांबोळी, सौ.साठे, सौ. वाघे, संजय वाघमारे, संगीता गोसावी, संगीता ढोण यांनी बालदिंडीस सहकार्य केले.



## जि.प.शाळेतील मुलांनी काढली दिंडी

**श्रीपूर** : विठू माऊलीच्या नामघोषात मुंडफणेवस्तीचा परिसर दुमदुमला. जि प मुंडफणेवस्ती शाळेतील विद्यार्थ्यांचा_बालदिंडी पालखी सोहळा हा उपक्रम मोठ्या जल्लोषात पार पडला. सर्वप्रथम पालखीचे पूजन शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व शाळेचे मुख्याध्यापक कदम व भोसले, आतार व मुलाणी यांच्या हस्ते झाल्यानंतर पालखीचे प्रस्थान करण्यात आले. बालवारकऱ्यांची बालदिंडी पाहून ग्रामस्थ व पालकांनीही आनंदाने पालखीचे पूजन करून दर्शन घेतले व रिंगण सोहळ्यात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यानंतर लहान व मोठे सर्व वारकरी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांनी फुगड्याचा आनंद घेतला उत्साही वातावरणात, माऊलीचा जल्लोष करत मुंडफणेवस्ती शाळेचा पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# केसीआर यांचे सोलापुरात भाजपलाही धक्कातंत्र

## वल्याळ यांना दिली ऑफर; भाजपचे चार माजी नगरसेवकही उपस्थित

**सुराज्य/सोलापूर**



भारत राष्ट्रसमितीचे अध्यक्ष तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांनी सोलापूर दौऱ्यात राष्ट्रवादी आणि भाजपला धक्का दिला आहे. काल सोमवारी केसीआर मंत्रीमंडळातील चार मंत्र्यांनी भाजपचे माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. तर आज मंगळवारी सायंकाळी स्वत: केसीआर यांनी आपल्या मंत्रीगणासह वल्याळ यांच्या निवासस्थानी धडक दिली.

यावेळी केसीआर यांनी वल्याळ यांना थेट बीएसआरमध्ये येण्याची ऑफर दिली. विशेष म्हणजे यावेळी केसीआर यांच्या स्वागतासाठी भाजपाचे चार नगरसेवक आणि सहा पदाधिकारी उपस्थित होते, हे विशेष.

पंढरपूर येथे आज सकाळी विठ्ठल रुक्मिणी दर्शन, तेथून मंगळवेढा आणि तेथून तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन केसीआर आपल्या सहकाऱ्यांसह सोलापुरात नागेश वल्याळ यांच्या निवासस्थानी आले.

भाजपाचे माजी खा. लिंगराज वल्याळ यांचे सुपुत्र माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांचे निवासस्थानी केसीआर यांच्या स्वागतासाठी माजी नगरसेवक सुरेश पाटील, संतोष भोसले, श्रीनिवास रिकमले, सुभाष शेजवाल यांच्यासह भाजपाचे उपाध्यक्ष दीनानाथ धुळम, व्यापारी आघाडीचे प्रमुख श्रीनिवास दायमा नागेश सरगम, संदुगटला आदी सहा ते सात पदाधिकारी उपस्थित होते. भाजपा नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी केसीआर यांचे स्वागत केल्याने शहर भाजपा गोटात मात्र चांगलीच खळबळ उडाली जात आहे.

### आग्रहाखातर विचार करायची वेळ आलीय : वल्याळ


आतापर्यंत बीआरएसमध्ये जाण्याचे निश्चित केले नव्हते. मात्र केसीआर यांची भेट घेतल्यानंतर त्यांच्या आग्रहाखातर विचार करायची वेळ आली आहे. युवकांची आज देशाला गरज आहे, असे सांगत त्यांनी पक्ष प्रवेशाची ऑफर दिली आहे. सोलापुरात आणखी काहीजण प्रवेश करतील असे त्यांनी सांगितले आहे. आपले सारखे तेलंगणाला येणे-जाणे असते, ते आमच्या घरी आले त्यांचा आम्ही पाहुणाचार केला आहे, असे नागेश वल्याळ यांनी सांगितले. तर माझ्या प्रभागात एका राज्याचा मुख्यमंत्री आला म्हटल्यावर प्रभागाच्या वतीने मी त्यांचे स्वागत केले, असे माजी नगरसेवक सुरेश पाटील म्हणाले.

### माजी लोकप्रतिनिधींनीही घेतल्या भेटी

सोलापुरातील सोमवारी केसीआर आल्यानंतर माजी आमदार रविकांत पाटील, विश्वनाथ चाकोते, स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे, माजी उपमहापौर अप्पाशा म्हेत्रे, माजी नगरसेवक उमेश मामडयाल, पुरुषोत्तम पोबत्ती, भाजपाचे नेते लक्ष्मणराव ढोबळे यांच्या कन्या कोमल ढोबळे यांनी केसीआर यांची भेट घेऊन चर्चा केली. या गाठीभेटी मुळे शहरातील राजकारणावर काय परिणाम होतो हे येणारा काळच सांगेल.

## ग्राहकांच्या विश्वासार्हतेमुळेच बँकेचा राज्यात लौकिक : माने

**सुराज्य/सोलापूर**



प्रगत तंत्रज्ञान आधुनिकता, तत्पर व सौजन्यशील सेवेमुळे ब्रह्मदेवदादा माने बँक व ग्राहकांचे जिव्हाळ्याचे संबध निर्माण झाल्यामूळेच बँकेचा राज्यात लौकीक असून जुळे सोलापूर भागातील ग्राहकांच्या मागणींनुसार सुमित्रा पार्क, जुळे सोलापूर येथे सर्व सोयींसुविधाने युक्त शाखा सुरू केल्याचे बँकेचे मार्गदर्शक तथा माजी आमदार दिलीप माने यांनी सांगीतले.

जुळे सोलापूर येथील सुमित्रा पार्क येथे ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँकेच्या सुमित्रा पार्क शाखा स्थलांस्तर सोहळ्यात माने यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते. यावेळी सहा उपनिबंधक आबासाहेब गावडे, सिध्दनाथ कारखान्याचे उपाध्यक्ष पृथ्वीराज माने, बँकेचे चेअरमन चंद्रकांत लिंबीतोटे, व्हा. चेअरमन दिगंबर तात्या मेटे, लेखा परिक्षक स्वाती जोशी,आदि मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धात्मक युगात बँकाची देखील सेवा देण्यात स्पर्धा सुरु असुन ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँकेने ग्राहकात मोठा विश्वास निर्माण केल्यामुळे बँक राज्यात अव्वल ठरली असुन हाच विश्वास कायमस्वरूपी जपुन बँकेने नवनवीन सेवा देण्याचा सदैव प्रयत्न केल्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुकाने सांगीतले.

यावेळी गिरिश गुड्डद, राहूल थोरवे, माजी नगरसेवक नागेश ताकमोगे, अभिमन्यु वाघमारे पाटील, धनंजय गायकवाड, बाळासो पाटील, सागर आवताडे, नागेश बिराजदार, आप्पासो काळे, राम गायकवाड, अंबादास कोळी, अनिल हिबारे, महेश घाडगे, इरेश खुने, शाम पाटील, सचिन चौधरी, बँकेचे संचालक मंडळ, व्यवस्थापक, शाखाधिकारी व बँकेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## बकरी ईदनिमित्त वेस्टेज जमा करण्यासाठी कचरा गाडी उपलब्ध करा

### एमआयएमच्या वतीने अतिरिक्त आयुक्तांना निवेदन

**सुराज्य/सोलापूर**

बकरी ईद सणानिमित्त वेस्टेज जमा करण्यासाठी प्रभागात ठिकठिकाणी कंटेनर व तसेच कचरा गाडी उपलब्ध करावी, अशी मागणी एमआयएम पक्षाच्यावतीने महापालिका अतिरिक्त आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

शुक्रवार दि. २९ जून रोजी बकरी ईद हा सण असून मुस्लिम बांधव हा सण मोठ्या प्रमाणात घरोघरी साजरा करत असतात. यावेळी बकरी ईद साजरी करत असताना बकऱ्याची कुर्बानी दिल्यानंतर त्याचे जे वेस्टेज इतरत्र न फेकता त्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रभागामध्ये ठीक ठिकाणी कंटेनर व कचरा गाडी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी एमआयएम पक्षाच्या वतीने सोमवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याप्रसंगी कोमारो सय्यद , नसीम खलिफा, सत्तार शेख हरीश कुरेशी, रियाज बागवान, वसीम शेख, माजी नगरसेविका वाहिदा भंडाले , माजी नगरसेवक अझहर हुंडेकरी, गाजी जहागीरदार, सलमा सय्यद, कम्मो शेख, यांच्यासह एमआयएम पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती शाहू महाराज जयंती विविध उपक्रमांनी साजरी





### आरएस मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था

**सुराज्य/सोलापूर**

आरएस मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे छत्रपती शाहू महाराज यांची १४९ वी जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम शाहू महाराज यांच्या प्रतिमेस संस्थेचे संस्थापक रविंद्र सरवदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्धवंदना घेण्यात आली. परिसरात मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी समीर नदाफ, रोहित जगताप, सागर बाबरे,संतोष कदम, दत्ता जगताप, सौरभ इबतहल्ली,सोहन सोनकांबळे, रोहन कांबळे, सागर कांबळे,सोनू बाबरे उपस्थित होते.

### प्रबुद्ध भारत तरुण मंडळ

**सोलापूर** : प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, थोरला राजवाडा, बुधवार पेठ, सोलापूर येथे लोककल्याणकारी, लोकराजा, छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या १४९ व्या जयंतीनिमित्ताने प्रबुद्ध भारत तरुण मंडळ पी बी ग्रुप वतीने म.न.पा. शाळा क्रमांक ११ व म.न.पा. शाळा क्रमांक २७ मधील शालेय विद्यार्थ्यांना मा. गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या नेतृत्वाखाली मिठाई वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस म.न.पा. प्रशासन अधिकारी ढेपे व विभागीय क्रमांक १ विभागीय अधिकारी जगधाने हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर म.न.पा. प्रशासन अधिकारी ढेपे, मुख्य सफाई अधीक्षक एन.सी. बिराजदार, मनपा शिक्षण मंडळाचे सुपरवायझर कासार यांचा सत्कार पी.बी.ग्रुपचे कार्याध्यक्ष आदित्य चंदनशिवे यांनी पुष्पहार घालून केला. या कार्यक्रमाप्रसंगी महेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते भारत बाबरे, अविनाश भडकुंबे चंद्रकांत सोनवणे, सुधीर तळभंडारे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, पी बी ग्रुपचे उपाध्यक्ष श्रीकांत वाघमोडे, सर्पमित्र अनिल अलदर, अँड. विशाल मस्के, आरोग्य निरीक्षक जितू मोरे ,आरोग्य निरीक्षक विजय साळुंखे, जमादार सिकंदर शेख, प्रथमेश सुरवसे, सुधीर जाधव, मनीष साळवे, सैफन मुल्ला ,सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र माने, रोहित वाघमारे, गौतम शिंदे, रवी सकट, तुषार रणदिवे, भीमा मस्के ,जयराज सांगे, प्रतीक चंदनशिवे , पप्पू शिंदे,आशुतोष इंगळे ,मनपा शाळा क्रमांक ११ व २७ शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

### समता सैनिक दल

**सोलापूर** : सामाजिक न्यायाचे प्रणेते , आरक्षणाचे जनक , प्रचंड ज्ञानी, विद्वान राजे छत्रपती शाहू महाराज यांच्या १४९ व्या जयंतीनिमित्त समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर ,शाक्य संघ आणि लोकराजा फाउंडेशन सोलापूर यांच्यावतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर मानवंदना देण्यात आली.

सोलापूरचे पोलीस आयुक्त राजेंद्र माने,समता सैनिक दलाचे जी ओ सी समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर, इतिहास संशोधक, शिवचरित्र व्याख्याते शिवरत्न शेटे , अंगद मुके,केरु जाधव, लोकराज्य फाउंडेशनचे अध्यक्ष आशुतोष तोंडसे यांच्याहस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी समता सैनिक दलाचे रत्नदीप कांबळे, विनोद जाधव , दिलीप गायकवाड,विठ्ठल थोरे, दाऊत आतार, सुमित्रा जाधव, कृपा जाधव, भौरम्मा वाघमारे,इत्यादी पदाधिकारी, सैनिक उपस्थित होते. शाक्य संघाच्या वतीने निवृत्त पोलीस अधीक्षक अशोक भालेराव, संघाचे अध्यक्ष अंगद मुके, अशोक दिलपाक, शांताराम वाघमारे, शेखर वाघमारे, कैलास गायकवाड, व्यंकटेश सोनवणे, आण्णा हजारे कोरे, कांबळे असे असंख्य पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

### माळशिरस नालंदा बुध्द विहार ट्रस्ट

**अकलूज** : आरक्षणाचे जनक छत्रपती शाहूमहाराज यांची जयंती नालंदा बुध्द विहार ट्रस्ट यांच्या वतीने माळशिरस येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून व वृक्षारोपण करून साजरी करण्यात आली.

यावेळी सहाय्यक गटशिक्षणाधिकारी करडे व जि प सदस्य बाळासाहेब धाइंजे , नुतन कृषी अधिकारी पंकज लोंढे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर १० व १२ वी तील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळेस प्रत्येक मुला मुलींना एक झाड भेट देण्यात आले तसेच जिल्हा परिषद शाळेतील गरीब व होतकरू पहिली ते सातवीतील मुला मुलींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले यानंतर नूतन कृषी अधिकारी पंकज लोंढे यांचा विशेष असा सत्कार करण्यात आला तसेच सुहानी पोपट गेजगे या मुलीने पुणे येथे झालेल्या तायकांदो कराटे स्पर्धेत ब्रॉंज पदक मिळविल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा दिपक धाइंजे, डॉ.कुमार लोंढे, प्रदीप धाईजे व जि प सदस्य बाळासाहेब धाइंजे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी जेष्ठ नेते आबाजी सावंत, अशोकबापु धाइंजे, ट्रस्टचे अध्यक्ष विकासदादा धाइंजे, मिलींद सरतापे, विशाल साळवे, दशरथ नवगीरे, सरपंच रजनीश बनसोडे , दादा नामदास , रणजीत सातपुते , राम कांबळे , चंद्रकांत कांबळेगुरूजी , रमेश धाइंजे , रणजीत सरवदे , डॉ राहुल केंगार , मोहन करडे , मिलींद गायकवाड, किरण धाइंजे , बुध्दभूषण धाईजे , अतुल धाइंजे ,अक्षय जाधव, लखन बेंद्रे ,बुध्दभूषण बनसोडे उपस्थित होते. आभार रणजीत धाइंजे यांनी मानले

### 'शिवरत्न' संस्था

**अकलूज** : शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या बीबीए महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. विश्वनाथ आवड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. भरत साठे यांनी केले. आभार बीबीएच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी सुदाम नायकुडे यांनी केले. यावेळी प्रा. नितीन कंगळे, प्रा. वसीम सय्यद, प्रा. कु. स्नेहा धाईंजे, कार्यालयीन कर्मचारी अमोल खरात व सौ. आशा खंडागळे सह विद्यार्थी उपस्थित होते.

### श्राविका महाविदयालय

उमाबाई श्राविका क. महाविद्यालय व साने गुरुजी कथामाला महाविदयालय शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्राविका महाविदयालयात प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. गणेश लेंगरे प्रमुख अतिथी होते. प्रास्ताविक प्रा. प्रतिभा कंगळे यांनी केले तर आभार प्रा.कल्याणप्पा हायगोंडे यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना कानडे यांनी केले. यावेळी या कार्यक्रमास प्रा. अविनाश मुळकूटकर,प्रा. सोमनाथ राऊत, प्रा. ज्योती बांगर, प्रा. प्राजक्ता काळे उपस्थित होत्या.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे नरळेवाडी, ता.सांगोला, जि.सोलापूर व परिसरातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नरळेवाडी, ता.सांगोला येथील जमीन गट नंबर ३४/१/ब क्षेत्र १ हे- ३२ आर, पो.ख. ० हे ०८ आर, आकार ० रू-७५ पैसे हि मिळकत रंजना प्रल्हाद जानराव, कल्पना दयानंद बनसोडे व वंदना बाळू वाघमारे यांचे मालकीचे आहे. सदरची वर नमूद संपूर्ण क्षेत्र रंजना प्रल्हाद जानराव, कल्पना दयानंद बनसोडे व वंदना बाळू वाघमारे यांनी आमचे अशिल रहीम करीम मुलाणी यांना कायम खूश खरेदी देण्याचे ठरवून रंजना प्रल्हाद जानराव, कल्पना दयानंद बनसोडे व वंदना बाळू वाघमारे यांनी ईसारापोटी आमचे अशिलाकडून भरीव रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, हस्तांतर, गहाण, दान, टाच, लीज अथवा अन्य मार्गाने गुंतवलेली नाही अशी हमी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लीज, लीन, इजमेंटरी राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थाचा बोजा, नोटरी करार, स्टॅम्प करार अगर इतर संस्थाचा बोजा असे काही असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात पुराव्यानिशी नोंदवाव्यात जर वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत अगर तक्रार न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. तारीख : २३/०६/२०२३

सही/-
अशिल

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.सचिन शिवाजी सरगर** B.S.L.LL.B.
रजि नं. MAH/10629/2021
ब्रह्मचैतन्यनगर गल्ली नं.२ सांगोला
जि.सोलापूर. मो.9665858224

# घोंगडीला हवीय 'राजाश्रया'ची ऊब

## पंढरीत आषाढी यात्रेत वस्तू आणि साहित्यांच्या विक्रीतून कोट्यवधींची उलाढाल

✔ सुराज्य/सोलापूर

**आषाढी वारी सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागातून वारकरी येत असतात.त्यादृष्टीने व्यापारीही नियोजन करतात. विविध प्रासादिक साहित्य, मूर्ती, उपवासाचे पदार्थ, बॅगा यासह उबदार घोंगडी व अन्य वस्तंमधून सुमारे ५० कोटींची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यापाऱ्यांचा व्यक्त केला.**



पंढरपुरात प्रमुख चार वारींपैकी आषाढी मोठी वारी असल्याने विविध पालखी सोहळे, दिंड्यांमधून लाखोंच्या संख्येने भाविक येतात. हे भाविक पांडुरंगाचे दर्शन घेऊन गावी परत जाताना नक्कीच पांडुरंगाचा प्रसाद म्हणून काहीतरी खरेदी करतात.त्यामुळे विविध वस्तू आणि साहित्यांच्या विक्रीतून कोट्यवधींची उलाढाल अपेक्षित असते. आषाढी वारी आली की महिनाभरापासून व्यापारी वर्गाची तयारी सुरू असते.मंदिर परिसरातील व्यापारी वर्षभराची उलाढाल केवळ एका वारीतून होत असल्याचे गृहीत धरून नियोजन करतात.

राज्याच्या विविध भागातून घोंगडी व्यवसायीत पंढरीत दाखल झाले असून महाराष्ट्रातील परंपरेचा महत्त्वाचा घटक म्हणून घोंगडी ओळखली जाते. प्राचीन काळापासून घोंगडी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात धनगर समाज मोठ्या प्रमाणात आहे. रानावनात, काट्याकुट्यातून, थंडी, वारा, ऊन, पाऊस याची कोणतीही तमा न बाळगता हातात काठी व अंगावर घोंगडी घेऊन आपला उदरनिर्वाह करणारा समाज म्हणजे धनगर,हातमागावर बनविलेली घोंगडी जवळपास आठ ते दहा वर्षे टिकते. बाजारपेठेत एका घोंगडीला १००० ते ५००० रुपयापर्यंत किंमत मिळते. अरुण एदमाळे यांनी सांगितले की, घोंगडीचे अनेक फायदे आहेत. थंडीच्या दिवसात ऊबदारपणा तर देतेच, शिवाय घोंगडीत आरोग्यविषयक गुणधर्म दिसून येतात. त्यामुळे घोंगडीला देश-विदेशात मागणी आहे, पण या व्यवसायाला म्हणावी तशी गती मिळालेली नाही. घोंगडी हा धनगर समाजाचा पारंपरिक व्यवसाय आहे. या समाजाचे ऋण फेडण्यासाठी मी गेल्या अनेक वर्षांपासून घोंगडी निर्मिती व्यवसायात उतरलो आहे. मी स्वतः टेक्स्टाइल इंजीनिअर आहे. मला सतत असे वाटायचे की, या नैसर्गिकरित्या उत्पन्न होणाऱ्या धनसंपदेचे - म्हणजे मेंढरांच्या लोकरीचे महत्त्व लक्षात घेता त्यास योग्य किंमत, स्थान दिले जात नाही. विशेष म्हणजे स्वयंरोजगाराची निर्मिती कशी करता येते, हे लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी या व्यवसायाकडे वळलो.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत' ही अतिशय स्तुत्य संकल्पना आणली आहे. व्होकल टु लोकल'मधून स्थानिक वस्तू जागतिक स्तरावर पोहोचण्यासाठी मोठा वाव मिळणार आहे. देशातील विविध स्थानिक वस्तूंबरोबर घोंगडीही जागतिक स्तरावर पोहोचली पाहिजे. तिला योग्य बाजारपेठ मिळाली पाहिजे.
>
> **- अरूण एदमाळे**
> घोंगडी उद्योजक, बाळूमामा घोंगडी उत्पादक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर



## श्री सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालयात बालविज्ञान कोपरा उपलब्ध

✔ **अक्कलकोट** : प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी.मोबाईल मध्ये गुंतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथाकडे आकर्षित करावे वाचलास तर जगशील हा विचार विद्यार्थांना समजावून सांगता यावा या हेतूने शासनाच्या आदेशानुसार बाल विद्यान कोपरा निर्माण करण्यात आला आहे. याचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनी मोफत.पुस्तके वाचनाचा फायदा घ्यावा असे आवाहन प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले. ग्रंथपाल गुरुनाथ हत्तीकाळे यांनी या योजनेचे महत्व सांगितले. वाचनालयाचे संचालक श्रीशैल. शिळ्ळे यांनी आभार मानले



## चांदापुरी येथे आठवडा बाजाराचे उद्घाटन

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथे आठवडा बाजाराचे उदघाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मदनसिह मोहीते पाटील यांच्या हस्ते करणयात आले. यावेळी चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ, पठाणवस्तीचे सरपंच एजाज पठाण, चांदापुरीचे उपसरपंच तात्यासाहेब चोरमले, पठाणवस्तीचे उपसरपंच तानाजी सुळ, पिलीव गटाचे माजी जि.प.सदस्य गणेशदादा पाटील, काळमवाडीचे माजी सरपंच दादासाहेब शिंगाडे, चांदापुरीचे ज्येष्ठ नेते केशवराव पाटील, विजय पाटील, चांदापुरी विकास सोसायटीचे चेअरमन तनवीर पठाण, शब्बीर पठाण, शाहीद शेख, तिसमारखान पठाण, फारुख खान पठाण, मुनीर शेख, प्रमोद मगर, नाथा सरक, अशोक सोनवणे, संतोष सरक यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थितीत होते. हा आठवडी बाजार दर रविवारी भरणार असुन चांदापुरी, पठाणवस्ती या दोन्ही गावातील नागरिकांना व आसपासच्या गावातील नागरीकांना याचा फायदा होणार आहे. या अगोदर या भागातील नागरिकांना पिलीव किंवा माळशिरस याठिकाणी बाजारासाठी जावे लागत होत पण या बाजारामुळे चांदापुरी, पठाणवस्ती, गारवाड, मगरवाडी, तरंगफळ, भागातील नागरिकांना या आठवडा बाजाराचा फायदा होणार आहे.

## अक्कलकोट येथे २० हजाराची चोरी

अक्कलकोट येथील समाधी मठाजवळ राहणाऱ्या शिवरुद्रप्पा कल्याणप्पा कापसे यांचा यांच्या बंद घराचा दरवाजा उचकटून चोरट्याने ७ हजार रुपये रोख आणि सोन्याचे दागिने असा २० हजाराचा ऐवज पळविला . ही चोरी काल सोमवारी पहाटेच्या सुमारास झाल्याची फिर्याद कापसे यांनी अक्कलकोट उत्तर पोलिसात दाखल केली . फौजदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत .

## माळशिरस विधानसभेचे आमदार राम सातपुते यांना मातृशोक

✔ **अकलूज** : जिजाबाई विठ्ठल सातपुते यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने सोमवार दि. २६ जून २०२३ रोजी सायंकाळी दुःखद निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे आमदार राम सातपुते यांच्या मातोश्री होत्या. जिजाबाई व विठ्ठल सातपुते यांनी प्रतिकूल परिस्थितीत संसार करून आपल्या मुलांना चांगले संस्कार व उच्च शिक्षण दिले. माळशिरस तालुक्यामध्ये अनेक वर्ष ऊसतोड कामगार म्हणून काम केले. त्यांचा मुलगा राम सातपुते यांना माळशिरस तालुक्याचे आमदार होण्याचे भाग्य लाभले. दोन-तीन महिन्यापासून त्यांच्यावर दवाखान्यांमध्ये औषध उपचार सुरू होते. माळशिरस तालुक्यामध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखींचे आगमन होऊन पालखी तालुक्याच्या सरहद्दीवरून पंढरपूरकडे जात असताना जिजाबाई विठ्ठल सातपुते यांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला.



# तरूण व महिलांनी शेतीपूरक अन्नप्रक्रिया उद्योगात प्रगती करावी : सतूबर

### हत्तूर येथे रोजगार मेळावा

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर



शासनाच्या शेतीपूरक अन्नप्रक्रिया उद्योगात क्षेत्रात तालुक्यातील तरूण व महिलांनी प्रगती करून विकास साधावा, असे प्रतिपादन शिवसेना (शिंदे गट)चे जिल्हा उपप्रमुख अण्णाप्पा सतुबर यांनी केले.

रविवारी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना सतुबर बोलत होते. हा रोजगार मेळावा कृषी कार्यालय दक्षिण सोलापूर व सोमेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित हत्तुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. पुढे बोलताना सतुबर म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील शासन आपल्या दारी उपक्रमअंतर्गत कृषी विभाग आपल्या दारी उपक्रमाच्या माध्यमातून कृषी संजीवनी कार्यक्रमांतर्गत खरीप पिकाची माहिती व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना ( पी. एम.एस. एम.) अंतर्गत विविध ८७ व्यवसायाच्या सहभागी व्हावे. या रोजगार मेळाव्यात कृषी अधिकारी दक्षिण सोलापूरचे रामचंद्र माळी यांनी बोलताना म्हणाले, शासनाने एक रूपयांत पीकविमा भरण्याची सोय करून दिली असून याचा लाभ घ्यावा. तसेच रोजगाराभिमुख उद्योग करावे, आसे आवाहन केले.

यावेळी दिपाली कदम यांनी बँकेकडून अनुदान मिळण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणार असल्याचे सांगितले. या मेळाव्यास कृषी मंडल अधिकारी शिल्पा कसबे, शास्त्रज्ञ अमोल शास्त्री, कृषी सहाय्यक सुवर्णा नरगिडे, तलाठी बागुल, बाबुराव काळे, उमेश मळेवाडी, सिद्धाराम बिराजदार, सोमनिंग कोळी, शंभूराजे भरले, अनिल भरले, राजकुमार उपासे, अमरनाथ कुलकर्णी, शिवानंद शिंगडगाव, गंगाधर चिवडशेट्टी, राघवेंद्र पाटील, संजय ममदापुरे, सोमेश्वर नागरी पतसंस्थेचे उपाध्यक्ष सोमनिंग होनमाने, सचिन हडपद, ड. बागवान, स्वाती उपासे, वंदना रोणे, प्राजक्ता निम्बर्गी, सोनाली कलसुरे, ग्राम समाजसेवक गणपती राठोड, एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापक यांच्यासह आदी उपस्थित होते.

## अयाज यांच्या जागर विठु माऊलीचा कार्यक्रमातून एकात्मताचे दर्शन

✔ सुराज्य/सोलापूर

नुकतेच तुकाराम महाराज पालखी च्या आगमन प्रसंगी नीरा नदीच्या काठावर सोलापूर जिल्हा चे ब्रॅन्ड अंम्बेसिडर व महाराष्ट्राचा महागायक मोहंमद अयाज यांच्या जागर विठु माऊलीचा हा भक्तीगीतांचा कार्यक्रम पार पडला.



हा कार्यक्रम जिल्हा अधिकारी सोलापूर व जिल्हा परिषद सोलापूर च्या वतीने आयोजित करण्यात आला होता या वेळी गायक मोहम्मद अयाज यांनी विठु माऊली तु, विठ्ठल विठ्ठल विठ्ठल, विठ्ठल नामाची शाळा भरली, विठ्ठल नामाचा रे टाहो, तसेच सोलापूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ही मोहम्मद अयाज यांना साथ देत कानड राजा पंढरीचा हे अप्रतिम भजन सादर केला.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सोलापूर जिल्हा चे पालकमंत्री विखे पाटील, जिल्हा अधिकारी मिलिंद शंभरकर, पाणी पुरवठा चे सचिन जाधवसह हजारो वारकरी संप्रदाय भक्तगण उपस्थित होते. मोहम्मद अयाज यांना सह गायिका भाग्यश्री चव्हाण यांनी साथसंगत केली.

## राज्य योगासन निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

✔ **सोलापूर** : नॅशनल योगासन स्पोर्ट्स फेडरेशन यांच्यातर्फे जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा ९ व १६ जुलै रोजी श्राविका संस्था, सम्राट चौक येथे सकाळी नऊ ते सहा या वेळेत संपन्न होणार आहेत. यासाठी ९ ते १४, १४ ते १८, १८ ते २८, २८ ते ३५, ३५ ते ४५, ४५ ते ५५ असे वयोगट असणार आहेत. सर्व वयोगटांचे ट्रॅडिशनल स्पर्धेचे राऊंड ९ तारखेला संपन्न होतील व १६ तारखेला आर्टिस्टिक सिंगल, आर्टिस्टिक पेयर व रिदमिक पेयर या स्पर्धा होणार आहेत. सिलॅबस, परिपत्रक, अधिक माहितीसाठी स्नेहल पेंडसे मोबाईल ९४०३६९४५३० या क्रमांकावर संपर्क साधावा.

## डांबून ठेवलेली ४९ जनावरे मुक्त; दोघांवर गुन्हा

✔ सुराज्य/अक्कलकोट

हालचिंचोळी ता.अक्कलकोट या गावात २६ जुन रोजी दुपारी ४ वाजण्याच्या दरम्यान काही इसमानी ४० ते ५० गाई आणून कोंडून ठेवले आहेत. अशी बातमी मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, सपोनी भावीकट्टी, पोसई पुजारी, पोकॉ उपाध्ये, पोकॉ ठेंगळे, पोकॉ राठोड, पोकॉ राऊत, पोहेकॉ वाळके, पोना चव्हाण भोसले, पोना चव्हाण, पशु वैदयकिय अधिकारी यांचेसह हालचिंचोळी गावात जाऊन चौकशी करता हालचिंचोळी हंजगी जाणारे कच्या रोडचे बाजूला राहिमान बाबू कुरेशी, महंमद बाबू कुरेशी रा. हालचिंचोळी यांनी त्यांचे शेतातील वस्तीवर ओढ्यात विहिरीचे बाजूला धोकादायक रित्या जीवाला धोका होईल अशा परिस्थितीत ४१ गाई, ०४ बैल व ०४ खोंड, असे एकूण ४९ जवानरे डांबून ठेवले होते. चारापाण्याची व निवाऱ्याची सोय न करता पावसात बांधून ठेवले होते.

सदर गाई बैल व खोंड कशाकरिता आणले याबाबत सदर इसमांना विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व कोणतेही खरेदी विक्रीच्या पावत्या, वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविले नाही. सर्व गाई, बैल व खोंड पोलिसांनी रीतसर ताब्यात घेऊन सुरक्षित गो शाळेत पाठविण्यात आले. सदर दोन इसमावर कायदेशीर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोसई पुजारी हे करीत आहेत.



## वेळापूर येथे संविधान समता दिंडीचे स्वागत

✔ सुराज्य/वेळापूर

सामाजीक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आळंदी-देहू ते पंढरपूर निघालेल्या संविधान समता दिंडीचे वेळापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर,जि.प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, वेळापूर पोलीस उपनिरीक्षक अल्ताफ काझी, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते स्वगात करण्यात आले.

वारकरी बांधवांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाटप करून कर्तव्याची माहिती देण्यात आली. या सविधान दिंडीचे आयोजन समाजकल्याण सचिव सुमित भांगे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक इंदिरा अस्वार, विभाग प्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण,यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. याप्रसंगी ख्यातनाम शाहीर विष्णुजी शिंदे यांचा प्रबोधनपर शाहिरीचा कार्यक्रम उत्साहा मध्ये संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक उत्तमराव जानकर, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, पोलीस उपनिरीक्षक अल्ताफ काझी, बहुजन मुक्ती पार्टीचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब जाधव, आरपीआय आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, विजयभाऊ बनसोडे, भैय्यासाहेब बाबर, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, शिवगंगा दूध डेरीचे चेअरमन भागवत गायकवाड ,दिलीप वाघमारे, शरद साबळे, प्रदीप सरवदे, स्वप्निल सरवदे, हर्षद बनसोडे, रणजीत सरवदे, दिलीप भोसले, प्रशांत बनसोडे, संजय देशपांडे, अमोल पनासे, जवान माने दे, अजय बनसोडे, विनायक भगत, राहुल गायकवाड, आप्पा कांबळे, दादासो गालफाडे, अमित धाईंजे, दिपक आयरे इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी

प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे, व कॅमेरामन राहुल कवडे, तांत्रिक विभागातील राहुल ढसाळ,तसेच समतादूत यशपाल चंदनशिवे,किरण वाघमारे,मुकुंद लोंढे,नालंदा चंदनशिवे,ज्योती ओव्हाळ अश्विनी मोरे, राजेश्री कांबळे परिश्रम घेत आहेत.

# शिवरंजनीच्या 'अमर लता'ला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

✔ सुराज्य/अक्कलकोट



सत्यम..! शिवम ..! सुंदरम..!, यशोमती मैया से बोले नंदलाला..!, एक प्यार का नगमा है..!, क्या यही प्यार है..! ओ जब याद आए बहुत याद आये..!, अशा एक ना अनेक मराठी-हिंदी भाव-भक्ति व चित्रपट गीते शिवरंजनी' सोलापूर प्रस्तुत अमर लता' सादरकर्ते- निर्मिता समीर रणदिवे, दिग्दर्शक - उन्मेश शहाणे, संकल्पना - शाईवाले व मोहोळकर, निवेदन - माधव देशपांडे यांच्या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उत्सपुर्त प्रतिसाद मिळाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, सोमवार सायंकाळी ७ वा. अमर लता' ह्या कार्यक्रमाने चौथे पुष्प संपन्न झाले. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन अँड.विजय हर्डीकर, एजाज मुतवल्ली, राजीव माने, बाळासाहेब मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास काँग्रेसचे केंद्रीय प्रदेश निरीक्षक आशिष दुवा, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे, काँग्रेस कमिटीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील व प्रदेश ओबीसी उपाध्यक्ष सुधीर भाऊ लांडे, जनसेवा संघटक अभिराज शिंदे हे देखील उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांसह कलाकारांचा न्यासाच्या वतीने प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्यासह मंडळाच्या पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल मचाले व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, विश्वस्त संतोष भोसले, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्वर उटगे, प्रथमेश इंगळे, नंदकुमार हंचाटे, गोविंदराव भंडारे, प्रा.नागनाथ जेऊरे, अमिन मुजावर, उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ट लाईट व्यवस्था अराद्य इलेक्ट्रिकल यांनी केले.

> **गुणीजन गौरव :** यामध्ये विशेषगौरव पुरस्कार माजी उप नगराध्यक्ष यशवंत तात्या धोंगडे व दक्षिण पोलिस ठाण्याचे पो.हे.कॉ. एजाज मुल्ला, दुय्यम उपनिबंदक डी.डी.चाटे, नागणसूर जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेचे शिक्षक शरणप्पा फुलारी, शहाजी प्रशालेचे शिक्षक राजेश पडवळकर व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या. अक्कलकोटचे वरिष्ठ तंत्रज्ञ बिलाल चाऊस यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# आरक्षणाचा लढा आता उग्र करणार : काशिद

✔ सुराज्य/बार्शी



गेली अनेक वर्षे मराठा समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवले जात आहेत. क्रांती दिनापुर्वी सरकारने ओ.बी.सी. प्रमाणे मराठयांना आरक्षण देण्याबाबत ठोस भुमिका घेतली नाही तर आरक्षणासाठी अधिक उग्र आंदोलन करण्याचा इशारा मराठा नेते आनंद काशिद यांनी दिला.

बार्शी तालुका तहसिल कार्यालयासमोर मराठा समाज बांधवाच्यावतीने करण्यात आलेल्या आरक्षण मागणीच्या आंदोलनामध्ये ते बोलत होते. यावेळी काशिद म्हणाले आरक्षण मिळाल्याशिवाय मराठा समाजातील आजपर्यंत विकासापासून वंचित राहिलेल्या समाज घटकांना न्याय मिळणार नाही. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आजपर्यंत क्रित्येक आंदोलने झाली, मोर्चे निघाले, अनेकांचे बळी गेले तरीही आरक्षण मिळालेले नाही. हि मोठी शरमेची बाब आहे. प्रत्येक सरकारने मराठा समाजाला केवळ आश्वासने दिली आहेत. कायदेशीर मार्गानेही ठोस तोडगा निघालेला नाही. त्यामुळे कायमस्वरूपी टिकेल असे आरक्षण समाजाला मिळालेच पाहिजे. आरक्षणाच्या मागणीची पुर्तता होण्यासाठी मराठा समाज बांधवांनी एकत्र येवुन सरकारवर दबाव आणण्याची गरज आहे. आरक्षणासाठी मराठा समाजातील सर्व पक्षीय राजकीय नेते, सनदी अधिकारी, उद्योगपती, शिक्षण संस्था चालक, विचारवंत या सर्वांच्या समन्वयाची गरज आहे.

यावेळी राष्ट्रवादी लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.विकास जाधव, नंदकुमार काशिद, खंडू डोईफोडे, अभिषेक पाटील यांनीही मनोगते व्यक्त केली. यावेळी विजय राउत, अजय पाटील, अजित बारंगुळे, आबा माने, बाबासाहेब कापसे आदी मराठा समाजातील मान्यवर उपस्थित होते.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त



### विटेवर साकारले विठुरायाचे देखणे रूप

✔ **पिंपरी** : चिंचवडमधील तरुणीने विटेवर 'विठ्ठला'चं हुबेहूब रूप साकारलं आहे. सध्या आषाढी वारीनिमित्त विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ वारकऱ्यांना लागलेली आहे. विठ्ठलाच्या एका छबीसाठी वारकरी आसुसल्याचं पहायला मिळते आहे. हेच आषाढी वारीचं औचित्य साधून तरुणीने विटेवर सावळ्या विठ्ठलाचं रूप रेखाटलं आहे. अनुजा चैतन्य जोशी अस या तरुणीचे नाव आहे. चार ते पाच तास विठूचं रूप साकारण्यासाठी लागल्याचे अनुजाने सांगितलं. साक्षात माझ्यासमोर 'विठ्ठल' उभे असल्याचे समजून विटेवर विठ्ठल साकारला आहे. असं अनुजा हिने सांगितलं आहे.

### बकरी ईदच्या सुट्टीची तारीख बदलली

✔ **मुंबई** : हजरत इब्राहिम यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ ईद-उल-अजहा (बकरी ईद) २९ जून रोजी साजरी होणार आहे. मात्र, महाराष्ट्र सरकारने बकरी ईद निमित्ताने २८ जून रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली होती. सार्वजनिक सुट्टीत बदल करण्यासाठी काँग्रेस नेते नसीम खान आणि मुदास्सर पटेल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले होते. काँग्रेस नेत्यांची ही विनंती मान्य करण्यात आली असून आता बकरी ईदची सार्वजनिक सुट्टी गुरुवारी २९ जून रोजी असणार आहे. महाराष्ट्र सरकारने अधिसूचना काढून यासंदर्भातील घोषणा केली आहे.

### राज्य सरकार उभारणार १६ पुनर्वसन केंद्र

✔ **मुंबई** : महाराष्ट्रातील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांत उपचार घेऊन मानसिक आजारातून बरे झालेल्या रुग्णांसाठी राज्यात १६ पुनर्वसन केंद्र सुरू करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. या नव्या केंद्रांमुळे मानसिक आजारातून बरे झालेल्यांना पुन्हा समाजात मानाने जगण्याची संधी मिळणार असून या केंद्रांमध्ये त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. दरम्यान, मानसिक आजारातून बरे झाल्यानंतर अनेकांना कुटुंब स्वीकारत नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा मंडळींसाठी ही केंद्रे दिलासा ठरणार आहेत.

### देशभरात २३ वंदे भारतचे जाळे

✔ **मुंबई** : देशभरात वंदे भारत एक्स्प्रेस जाळे विणले जात असून अनेक महत्त्वाच्या स्थानकांना ही एक्स्प्रेस जोडली जात आहे. देशभरात सध्या १८ वंदे भारत एक्सप्रेस धावत असून मंगळवारी आणखीन पाच वंदे भारत एक्स्प्रेसला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे. त्यामुळे देशभरात २३ वंदे भारत धावणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी भोपाळ येथील राणी कमलापती स्थानकातून पाच वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखविणार आहेत. यामध्ये राणी कमलापती (भोपाळ) ते इंदौर, भोपाळ ते जबलपूर, रांची ते पाटणा, धारवाड ते बंगळूरु आणि मडगाव ते सीएसएमटी वंदे भारत एक्स्प्रेसला चालवण्यात येणार आहेत. दरम्यान, मडगाव ते सीएसएमटी वंदे भारत एक्स्प्रेसचे चेअर कारचे साधारण तिकिट दर १,४३५ रुपये आहे, तर एक्झिक्युटिव्हचे तिकिट दर २,९२१ रुपये असे असणार आहेत.

### भरघाव वाहनाची दुचाकीवरील दाम्पत्याला धडक

✔ **पुणे** : भरधाव वाहनाने दुचाकीवरील दाम्पत्याला धडक दिल्याने सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-सोलापूर महामार्गावर घडली. अपघातात दुचाकीस्वार पती गंभीर जखमी झाला. छाया सुहास जाधव (वय ३४) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. अपघातात छाया यांचे पती सुहास शरद जाधव (वय ४०) गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती लोणी काळभोर पोलिसांनी दिली. याबाबत छाया यांचे बहीण रेणुका साळुंखे (वय ३२, रा. सोरतापवाडी, पुणे-सोलापूर रस्ता) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### विद्यापीठासाठी 'ई स्टडीज ऑफ बोर्ड'

✔ **छत्रपती संभाजीनगर** : राज्यातील विद्यापीठांमधील अभ्यास तज्ज्ञांचे एक मंडळ 'ई स्टडीज ऑफ बोर्ड' म्हणून स्थापन करण्यात येणार आहे. या मंडळाद्वारे विद्यापीठांमध्ये शिकवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांवर लक्ष ठेवले जाईल. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने एक सुकाणू समिती गठित केली आहे. 'ई स्टडिज ऑफ बोर्ड' ही नवी संकल्पना आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षण संस्थांच्या बहुउद्देशीय संस्थांमध्ये समूह विद्यापीठांची संकल्पना आणली जात आहे.

### नातीच्या प्रेमापोटी आजोबांची अशीही धडपड

✔ **नागपूर** : वृद्ध वडिलांना कुटुंबियांनी घरातून बाहेर काढले. मात्र, चार वर्षांची आवडती नात घरी आल्याचे कळताच आजोबाचा नातीवरील प्रेमांचा बांध फुटला. त्यांनी तिला भेटण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. मात्र, कुटुंबियांचा विरोध आडवा आला. अखेर अंगणात खेळत असलेल्या नातीला घेऊन आजोबा पसार झाले. दुसऱ्या दिवशी मात्र चिमुकलीला परत घरी सोडून आजोबा पुन्हा घराबाहेर निघून गेले. मात्र, मुलगी घरी नसल्याने कुटुंबियांची चांगलीच तारांबळ उडाली. नात आणि आजोबाच्या प्रेमाचा दाखला देणारी ही घटना अंजनी परिसरात घडली.

### नोकराने केली ढाबा मालकाची हत्या

✔ **अकोला** : राष्ट्रीय महामार्गावरील कुरुमनजीक कामगाराने शेरे बिहार ढाबा मालकाची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. नवसाळ फाट्याजवळ आलम भाई व मो. शोएब अंसारी यांचा शेरे बिहार ढाबा आहे. करोना काळात ३५ वर्षीय दुल्हाचंद नामक युवक ढाब्यावर आला होता. मदतीची याचना केल्यावर ढाबा मालकाने त्याला कामावर ठेवले. तेव्हापासून तो ढाब्यावरच राहत होता. दरम्यान, सोमवारी ढाबा मालक व कामगारात किरकोळ वाद झाला. या वादातूनच कामगार दुल्हाचंद ढाबा मालक मो. शोएब अंसारी (३८) यांच्यामागे कुऱ्हाड घेऊन धावत गेला. त्याने कुऱ्हाडीने सपासप वार केल्याने ढाबा मालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

### सेवाग्राम आश्रमातील आखरी निवास खुले

✔ **वर्धा** : सेवाग्राम आश्रम देश विदेशातील पर्यटक तसेच गांधी अभ्यासकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. मात्र या परिसरातील एक वास्तू तब्बल दीड महिने बंद ठेवण्यात आली होती. ती आता खुली करण्यात आली आहे. या आखरी निवासचे खास ऐतिहासिक मूल्य आहे. या निवासात महात्मा गांधी सहा महिने राहले होते. २५ ऑगस्ट १९४६ ला गांधीजींनी याच निवासातून दिल्लीला प्रयाण केले होते ते परत न येण्यासाठी. म्हणून हा आखरी निवास ओळखला जातो. १९३६ साली गांधीजींनी आश्रमाची स्थापना केली होती. येथे बापू कुटी व अन्य निवास आहेत.

# तरुणीवर कोयत्याने वार पण, अनर्थ टळला...

## ▶ सदाशिव पेठेत भरदिवसा घडलेला थरार

✔ सुराज्य/पुणे

**काही दिवसांपूर्वी दर्शना पवार या एमपीएससी उत्तीर्ण तरुणीची राजगडाच्या पायथ्याशी हत्या झाली होती. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. ही घटना काही दिवस उलटतात तोवर पुण्यात अजून एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शहरातील सदाशिव पेठ भागात भरदिवसा एका तरुणीवर कोयत्याने वार करण्यात आले. तरुणीवर वार करत असताना तिथं उपस्थित असलेल्या दोन युवकांनी मध्यस्थी केल्याने तरुणीचा जीव वाचला आहे.**

यादरम्यान तरुणाने आपल्यावर हल्ला का केला? आज नेमकं काय झालं? असं विचारलं असता पीडित तरुणीने आपली प्रतिक्रिया समाजमाध्यमांना दिली आहे. मी कॉलेजला चालली होती. तो मला पाच मिनिट बोल...बोल, असं म्हणत होता. पण मी नकार दिल्याने त्याने माझ्यावर कोयत्याने वार केलेत. तो माझ्यामागे कोयता घेऊन पळायला लागला, त्याला लोकांनी पकडलं. त्याला मारहाण केली. कॉलेजमध्ये आम्ही मित्र होतो. मी त्याच्याशी बोलणं बंद केलं म्हणून त्याने धमक्या दिल्या, असं पीडितेनं यावेळी सांगितलं.

पीडित तरुणी म्हणाली की, 'तो माझा मित्र होता. त्याने मला प्रपोज केला असता, त्याला मी नकार दिला. त्यानंतर तो मला जीवे मारायच्या धमक्या देऊ लागला. माझ्या कॉलेजजवळ येऊन मला फोन करायचा, मला मारहाण करायचा. त्याला नकार दिल्यावर देखील तो माझा सतत पाठलाग करायचा. त्यानंतर मी त्याची तक्रार त्याच्या घरच्यांकडे केली, पण त्यांनी काहीच ॲक्शन घेतली नाही. मी त्याच्या घरी तक्रार केली म्हणून त्याने आज माझ्यावर वार केलेत. त्यामुळे माझ्या हाताला लागलंय आणि डोक्याला देखील टाके पडलेत.

माझा काही दोष नसताना त्याने मला मारण्याच्या धमक्या दिल्या, मला मारहाण केली. कॉलेजजवळ येऊन कोयत्याने वार केले.

दरम्यान या परिसरात असलेल्या स्थानिक तरुणांनी वेळीच धाव घेत आरोपी शंतनू जाधव याच्या हातून कोयता हिसकावून घेत मुलीचा जीव वाचवला. त्यानंतर त्याला चोप देत पोलीस ठाण्यात नेऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं. या घटनेत दोघेही तरुण तसेच तरुणी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी करत आहेत.



## ▶ राज्यावर पुढचे ३-४ अस्मानी संकट

# मुंबई-पुण्यासह ७ जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाचा इशारा

✔ सुराज्य/मुंबई

मान्सूनने यंदा उशिरा हजेरी लावली असली तरी सुरुवातीच्या हंगामातच तुफान पाऊस सुरू आहे. गेल्या ३ दिवसांमध्ये राज्यात सर्वत्र मान्सून दाखल झाला असून आज आणि उद्या हवामान खात्याकडून राज्याला ऑरेंज आणि येलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईसह उपनगरांत, रायगड, पुणे, कोकण, मराठवाडा आणि विदर्भात यामुळे जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अशात राज्यासाठी पुढचे ३-४ तास महत्त्वाचे आहेत.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पुढील ३-४ तासांत मुंबई जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते तीव्र स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर ठाणे आणि नाशिक, पुणे, सातारा जिल्ह्यांतील घाट परिसरात काही ठिकाणी मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. यासंबंधी



आयएमडी मुंबईकडून इशारा देण्यात आला आहे. तर पालघर जिल्ह्यांतील काही ठिकाणी पावसाच्या तीव्र ते अतितीव्र सरी पडण्याची शक्यता आहे. इतकंच नाहीतर पुढील ३-४ तासांत जळगाव जिल्ह्यामध्येही काही ठिकाणी हलक्या सरी पडतील अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.


**राज्याला ऑरेंज आणि येलो अलर्ट**

दरम्यान, आज दिवसभरात नाशिकसह पश्चिम महाराष्ट्रामध्ये अतिमुसळधार पाऊस होईल अशी शक्यता आहे. तर मराठवाड्यामध्येदेखील सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असा हवामान खात्याचा इशारा आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचे क्षेत्र तीव्र झाल्यामुळे २७ आणि २८ जून रोजी राज्यात ऑरेंज आणि येलो अलर्ट असणार आहे तर महाराष्ट्रातील कोकणात आणि मध्य महाराष्ट्राच्या काही महत्त्वाच्या भागांमध्ये तर विदर्भातही अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आगे. दरम्यान, २९ आणि ३० जूनला महाराष्ट्रात तुफान पाऊस होईल. पण यावेळी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला नाही.

# पुण्यात टोळीयुद्धाचा भडका

## ▶ मध्यरात्री गाड्यांची तोडफोड

✔ सुराज्य/पुणे



दोन टोळक्यांच्या पूर्ववैमनस्याच्या वादातून रात्री दोनच्या सुमारास शहरातील अरण्येश्वर येथे १० ते १२ गाड्या फोडल्याची घटना घडली आहे. यावेळी टोळक्यांनी एका घराचा दरवाजा कोयत्याचे वार करत तोडण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून परिसरातील रहिवाशांमध्ये दहशत पसरली आहे. दोन टोळींच्या वादातून हा प्रकार घडल्याची माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील सहकारनगर हद्दीत आण्णाभाऊ साठे वस्तीत सोमवारी रात्री दोनच्या सुमारास काही अज्ञात टोळक्यांनी १० ते १२ दुचाकि फोडल्या होत्या, हा सगळा प्रकार जुन्या वादातून घडला असावा असे स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र, सहकारनगर हद्दीत यापूर्वीही टोळी युद्धाच्या वादातून नागरिकांच्या गाड्या फोडल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर सहकारनगर पोलीस स्टेशनवर गुन्हे शाखेच्या अखत्यारीत ठेवण्यात आले होते. परंतु, तरीही याचा काही उपयोग होताना दिसत नाही. गुन्हेगार प्रवृत्तीच्या टोळ्या सरेआम पुणे शहरात दहशत माजवण्याचं काम करतच आहे.

अण्णाभाऊ साठे वस्तीत गाड्यांची तोडफोड झाल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त सुनील झेंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. या प्रकरणाची एका स्थानिकाने पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मंगळवार सकाळीपासून अज्ञात आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे.

# तोंड काळे केले नसते तर ही वेळ आली नसती



## ▶ फडणवीसांचा खडसेंना टोला

✔ सुराज्य/मुंबई

भाजपा नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार एकनाथ खडसे यांनी फडणवीसांना जळगावात आलात तर काळे झेंडे दाखवले जातील, असा इशारा दिला होता. याबाबत देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले की, 'जमिनीमध्ये जर त्यांनी तोंड काळ केलं नसतं तर त्यांना काळे झेंड दाखवायची वेळ थोडी आली असती, ते परिवारात राहिले असते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'माझं मत आहे कोणाची धरपकड करण्याची आवश्यकता नाही आहे. काळे झेंडे दाखवून त्यांना काय फायदा होणार आहे.

खरं म्हणजे खडसेंच असं झालं आहे त्यांना नवीन मालक मिळाला आहे. त्यांना नवीन मालकाने सांगितलं तसं ते वागत आहेत. आता जमिनींमध्ये जर त्यांनी तोंड काळ केलं नसतं तर काळे झेंड दाखवायची वेळ थोडी आली असती, ते परिवारात राहिले असते. नवीन मालकाकडे थोडीच जावं लागलं असतं. त्यामुळे अशा काळ्या झेंड्यांना घाबरणारे लोकं थोडी आहोत आम्ही. असे काळे झेंडे किती दाखवले तरी आम्ही जनतेचे लोकं आहोत, जनतेकरता काम करत आहोत. जनतेला फायदा देण्याकरता याठिकाणी आलो आहोत आणि जळगावची जनता आमच्यासोबत आहे', असे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, फडणवीस मंगळवारी शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी जळगावला जाणार आहेत. त्यानिमित्ताने एकनाथ खडसे यांनी काळे झेंडे दाखवण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांची व कार्यकर्त्यांची धरपकड सुरू आहे.

# एकदिवसीय विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर

✔ सुराज्य/नवी दिल्ली

भारतात यावर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक ट्रॉफीचे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने चक्क अंतराळातून प्रक्षेपण केले आहे. यानंतर आता आयसीसीने विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. भारतात ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान स्पर्धा खेळवली जाणार असून पहिला सामना इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे, तर भारताचा पहिला सामना ८ ऑक्टोबरला होणार आहे. परंतु या स्पर्धेतील महत्त्वाच्या म्हणजे भारत आणि पाकिस्तान सामन्यावर संपूर्ण जगाचे लक्ष असणार आहे.

भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे वेळापत्रक आयसीसीने जाहीर केले आहे.भारतात ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान खेळवण्यात येणाऱ्या स्पर्धेतील पहिला सामना २०१९ च्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दोन संघात म्हणजेच इंग्लंड आणि न्यूझीलंड या संघात होणार आहे. हे दोन्ही संघ ५ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर स्पर्धेतील पहिला सामना खेळणार आहेत. त्याचबरोबर भारताचा पहिला सामना ऑस्ट्रेलियाशी ८ ऑक्टोबरला चेन्नईच्या मैदानावर होणार आहे. ड्राफ्ट शेड्यूलमध्ये कोणताही मोठा बदल करण्यात आलेला नाही आणि १५ ऑक्टोबरला अहमदाबाद नरेंद्र मोदी मैदानावर भारत पाकिस्तान यांच्या महामुकाबला होणार आहे. या सामन्यावर जगातील क्रिकेट प्रेमींचे लक्ष असणार आहे.

या स्पर्धेतील पहिली उपांत्य फेरी मुंबईमध्ये १५ नोव्हेंबर तर दुसरी उपांत्य फेरी १६ नोव्हेंबरला होणार आहे, तर अंतिम सामना १९ नोव्हेंबरला अहमदाबाद मैदानावर होणार आहे.

# स्वामी समर्थांचा आशीर्वाद अन् प्रेक्षकांचे प्रेम यावरच मालिकेचा अखंड प्रवास सुरू : अक्षय मुडावदकर

## ▶ कलाकारांची 'सुराज्य' कार्यालयास सदिच्छा भेट

✔ सुराज्य/सोलापूर

श्री स्वामी समर्थ मालिकेच्या माध्यमातून बालमन आणि भावी पिढीवर चांगले संस्कार होत असल्याची पालकांची प्रतिक्रिया ही आम्हा कलाकारांसाठी आमच्या कामाची पावती आहे. स्वामी समर्थांचा आशीर्वाद आणि प्रेक्षकांचं प्रेम यावरच या मालिकेचा अखंड प्रवास सुरु असल्याची भावना श्री स्वामी समर्थ मालिकेत स्वामी समर्थांची भूमिका पार पाडत असलेले अक्षय मुडावदकर यांनी व्यक्त केली.

कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या श्री स्वामी समर्थ मालिकेतील अभिनेते अक्षय मुडावदकर सोमवारी सोलापुरात आले होते. यानिमित्ताने त्यांची भेट घेऊन श्री स्वामी समर्थ मालिकेतील अनुभवाविषयी विचारले असता, अभिनेते अक्षय मुडावदकर यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली. कलर्स मराठी या मराठी वाहिनीवर श्री स्वामी समर्थ ही भक्तिरुप मालिका गेली अडीच वर्षे प्रदर्शित होत आहे. या मालिकेचे ८५० भाग प्रेक्षकांपर्यंत आले आहेत, त्यास प्रेक्षकांचा मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व आहे.

कलर्स मराठी वाहिनीवर अनेक मालिका प्रदर्शित होत आहेत. त्यातीलच 'पिरतीचा वनवा उरी पेटला' या मालिकेतील प्रमुख अभिनेत्री रसिका ऊर्फ सावी आणि अभिनेते इंद्रनील ऊर्फ अर्जुन यांनी सोमवारी अक्कलकोट निवासी स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. युवा वर्गाचं आकर्षण म्हणून गणली जात असलेली मालिका 'पिरतीचा वनवा उरी पेटला' आमच्यासाठी महत्वाची आहे.या मालिकेपूर्वी अन्य मालिकांत अभिनय साकारला असला तरी या मालिकेत अभिनेत्री म्हणून मिळालेली प्रमुख भूमिका माझ्यासाठी उल्लेखनिय संधी आहे, असं रसिका हिने म्हटले.

अक्कलकोटस्थित स्वामींच्या दर्शनाने मन प्रसन्न झाल्याचे रसिका आणि इंद्रनील यांनी प्रारंभी म्हटले. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना, अभिनेते इंद्रनील कामत



यांना कॅमेऱ्यासमोरचा अभिनय करण्याचा पहिला प्रयत्न होता. पडद्यावर अभिनय करताना, प्रारंभी थोडा दडपणाखाली असल्यासारखे वाटायचे. मात्र आता मजेशीर प्रवास चालल्याचे अर्जुन यांनी प्रारंभी सांगितले. आम्हाला ही सुसंधी उपलब्ध करून दिल्याबद्दल कलर्स मराठी वाहिनीचे आभार मानून, प्रेक्षकांचं आमच्यावर असंच प्रेम राहू द्या, असं आमचं पांडुरंगाकडे एकच मागणं असणार आहे, असेही सावी आणि अर्जुन यांनी शेवटी सांगितले.






# महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेची संधी

✔ सुराज्य/पंढरपूर

**राज्यातील जनतेच्या आरोग्य सेवेसाठी शासनामार्फत अनेक योजना आणि उपक्रम राबविले जात आहेत. पंढरपूरच्या आषाढी यात्रेत महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून वारकऱ्यांची आरोग्य सेवा करण्याची संधी मिळाली. आरोग्य विभागाने या संधीचे सोने करत वारकऱ्यांप्रती असलेले आपले उत्तरदायित्व निभावले आहे, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी वाखरी येथील महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी केले.**

## आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांचे प्रतिपादन



आषाढी वारी निमित्त पंढरपूर येथे वाखरी, ६५ एकर आणि गोपाळपूर या तीन ठिकाणी महाआरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली असून वाखरी येथे शिबिराचे उद्घाटन आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी खासदार हेमंत पाटील, तेलंगणचे आमदार मुघरामजी दयानंद व श्री. मैनवपल्ली, आरोग्य सेवा संचालक डॉ. स्वप्नील लाळे, आरोग्य उपसंचालक आर. डी. पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील, नोडल अधिकारी डॉ. धर्मेंद्रकुमार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, डॉक्टर्स, आणि वारकरी भाविक उपस्थित होते.

आरोग्य मंत्री सावंत म्हणाले, राज्य शासनाने स्त्रीशक्ती आणि मातृशक्तीचा नेहमीच सन्मान केला आहे. राज्यातील महिला निरोगी राहाव्यात यासाठी माता सुरक्षित घर सुरक्षित हे अभियान राबवून या अभियानात सुमारे चार कोटी ३९ लाख महिलांची तपासणी केली. जागरूक पालक सदृढ बालक या अभियानातही आरोग्य विभागाने चांगले काम केले आहे. आता आरोग्य विभागामार्फत १८ वर्षावरील सर्व पुरुषांची तपासणी करण्यासाठी अभियान राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार हेमंत पाटील यांनी राज्य शासनाने आरोग्य शिबिराच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेला प्राधान्य दिले. आषाढी वारीमध्ये आयोजित केलेले महाआरोग्य शिबीर एक नाविन्यपूर्ण उपक्रम ठरेल यात शंका नाही, असा विश्वास व्यक्त केला.

ज्योती वाघमारे म्हणाल्या की, राज्य शासनाने महिलांसाठी विविध योजना राबवून स्त्री शक्ती आणि मातृशक्तींचा सन्मान केला आहे. ५ कोटी महिलांची आरोग्य तपासणी करून ६५ हजार महिलांचे मोफत ऑपरेशन केले आहे. एसटीमध्ये ५० टक्के सवलतही दिली आह.

प्रा. शिवाजी सावंत यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या घोषवाक्यासह आरोग्य विभाग या शिबिराच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या सेवेत कार्यरत असल्याचे सांगितले.

शिबीर २७ ते २९ जून या कालावधीत २४ तास चालू राहणार आहे. शिबिरामध्ये १० लाख लोकांची मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार व गंभीर आजाराच्या रुग्णाकरिता महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये संदर्भ सेवा देऊन मोफत उपचार, शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

शिबीर उद्घटनानंतर सावंत यांच्यासह मान्यवरांनी शिबिरातील विविध तपासणी कक्षात भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला.

### शिंदे सरकार हे सर्व सामान्यांचे : श्रीकांत शिंदे

खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले, आरोग्य वारी पंढरीच्या दारी या घोषवाक्यासह आरोग्य विभागाने वारकऱ्यांना सेवा देण्याचे काम केले आहे. हे सरकार सर्वसामान्यांचे सरकार आहे. सर्वसामान्य जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून शासनाने गेल्या वर्षभरात अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. पंढरपूरच्या आषाढी वारीत वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी मुख्यमंत्री स्वतः नियमित आढावा घेत आहेत.

## आतापर्यंत १४ लाख वारकऱ्यांनी घेतले दर्शन

✔ सुराज्य/पंढरपूर

सावळ्या विठुरायाच्या भेटीसाठी ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता शेकडो मैलांची पायपीट करत पंढरपूरला येणाऱ्या जास्तीत जास्त भाविकांना दर्शन घेता यावे यासाठी पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामुळे गेल्या आठ दिवसात सुमारे १४ लाख भाविकांनी विठुरायाचे दर्शन घेतले. आषाढी वारी, गोपाळकाला आणि प्रक्षाळपूजेपर्यंत हेच नियोजन राहणार असल्याने सुमारे ३० लाख भाविकांना दर्शन घडणार आहे.

२० जूनपासून मंदिरामध्ये २४ तास मुख दर्शनाची सुविधा सुरू केली आहे. त्यामुळे २४ तासात किमान १ लाख १५ हजार भाविकांना दर्शनाचा लाभ मिळतो. पददर्शनासाठी शेजारती, धुपारती, पोषाख अशा विधी टाळण्यात आल्या आहेत. नित्य पूजा, गंधाक्षता, नैवेद्य आणि लिंबू पाणी या विधीसाठी दीड तास पददर्शन बंद ठेवण्यात येते. दर्शन रांगेत पिण्याच्या पाण्याची सोय आहे. आषाढीच्या काळात चार दिवस चहा आणि खिचडी वाटप करण्यात येणार आहे.



## संत निवृत्तीनाथांची पालखी चिंचोलीला मुक्कामी

✔ सुराज्य/पंढरपूर

'देव पाहावयासी गेलो, तेथे देवची होऊनी ठेलो, पंढरीची वारी, वारी चुकू न देवो हरी, ज्ञानेश्वर माउली ज्ञानराज माउली तुकाराम..' असा हरिनामाचा गजर करत राज्यभरातील दिंड्या बुधवारी पंढरपूरला पोहचणार आहेत. तर राज्यातील सात दिंड्यापैकी मानाची दिंडी असलेल्या संत मुक्ताबाईंची पालखी पंढरपुरात पोहचली आहे. अनेक दिंड्या या पंढरपुरात पोहचल्या असून विठूरायाची नगरी वारकऱ्यांनी दुमदुमून गेली आहे. संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी पंढरपूरच्या जवळ पोहचली असून पांढरेवाडी येथील मुक्कामानंतर संत निवृत्तीनाथ महाराज पालखी चंद्रभागेच्या तीरी वसलेल्या चिंचोलीकडे मार्गस्थ झाली आहे.

गेल्या चोवीस दिवसांपासून राज्यातील विविध जिल्ह्यातून दिंड्यानी पंढरपुराकडे कूच केली आहे. अखेर पंचवीस दिवसांच्या पायी वारीनंतर अनेक दिंड्या पंढरपुरात पोहचल्या आहेत. अनेक दिंड्या पंढरपूरच्या मार्गावर आहेत. जवळपास चोवीस दिवसांहुन अधिक दिवसांचा पायी प्रवास करत मजल दर मजल करत दिंड्या पंढरपूरला पोहचत आहेत. भक्तित तल्लीन झालेले वारकरी, अभंगांच्या गोडीने अन् विठ्ठलाच्या ओढीने एक एक पाऊल पंढरीच्या दिशेने टाकत आहेत. संत मुक्ताबाईंसह संत निवृत्तीनाथांची पालखी २ जून रोजी निघालेली असून मुक्ताबाईंची पालखी सोमवारी पंढरपुरात पोहचली आहे. तर संत निवृत्तीनाथांची पालखी पांढरेवाडीला मुक्कामी होती. या मुक्कामानंतर नाथांची पालखी सकाळी पंढरपूरजवळील चिंचोलीकडे मार्गस्थ झाली आहे.

राज्यभरातून निघालेल्या दिंड्यामध्ये उत्साह ओसंडून वाहत आहे. अवघ्या काही अंतरावर पंढरपूर असून एका मुक्कामानंतर दिंड्या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात पोहचतील. त्यामुळे दिंडीतला वारकरी सुखावला आहे. विठुरायाच्या भेटीसाठी आतूर झाला आहे. कधी एकदाची पांडुरंगाची भेट होतेय, अशी अवस्था वारकऱ्यांची झाली आहे. संत निवृत्तीनाथांची दिंडी पांढरेवाडीहून निघून चिंचोलीला पोहचली आहे.

## सामाजिक सलोख्यासाठी मुस्लिम बांधवांची अशीही 'कुर्बानी'

### आषाढीमुळे बकरी ईदला कुर्बानी न देण्याचा निर्णय

✔ सुराज्य/मंगळवेढा

हिंदू धर्मातील पवित्र आषाढी एकादशी व मुस्लिम धर्माचे पवित्र ईद उल जुहा तथा बकरी ईद गुरुवारी दि.२९ जून या दोन्हीही सण एकाच दिवशी येत आहेत. हिंदू-मुस्लिम सामाजिक सलोख्यासाठी मुस्लिम समाजाने मंगळवेढा शहर व तालुक्यात ईद उल्-जुहा ची नमाज ईदगाह मैदान व मोहल्ल्यातील मस्जिद मध्ये सामुदायिक नमाज पठण सकाळी होणार आहे. बकऱ्याची कुर्बानी आषाढी एकादशी दिवशी करण्यात येणार नाही असा समाजाभिमुख निर्णय घेतला आहे.

मंगळवेढा तालुक्यात गेली ५० वर्षापासून हिंदू-मुस्लिम उत्सव सामाजिक सलोख्याने व शांततेने पार पाडत असून आतापर्यंत कुठेलेही गालबोट लागले नाही असा आदर्श येथील बांधवांनी घेतला आहे. मंगळवेढा तहसील कार्यालयात तहसीलदार मदन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व परिविक्षाधीन आयपीएस अधिकरी तथा मंगळवेढा पोलीस निरीक्षक साटम यांच्या प्रमुख उपस्थितीत मुस्लिम समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. आमदार समाधान आवताडे यांनी आषाढी एकादशी दिवशी कुर्बानी करू नये इतर दिवशी कुर्बानी करावी अशी विनंती मुस्लिम समाजास केली होती. त्या अनुषंगाने मुस्लिम समाजाची बैठक आयोजित केली होती.

## तेलंगणाचे मुख्यमंत्री राव यांनी घेतले विठ्ठलाचे दर्शन

✔ सुराज्य/पंढरपूर

तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि भारत राष्ट्र समितीचे अध्यक्ष के चंद्रशेखर राव यांच्या सह त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी श्री विठ्ठल रुक्मिनिमातेचे दर्शन घेतले. मंदिर समितीने मुख्यमंत्री राव यांचा सत्कार केला. दर्शन रांगेतील भाविकांना त्रास होऊन नये आणि राजशिष्टाचार पाळून अवघ्या दहा मिनिटात त्यांनी दर्शन घेऊन पुन्हा दर्शन रांग पूर्ववत केल्याची माहिती विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी विठ्ठलाचे दर्शन घेतले. दर्शनासाठी येताना ते आणि आणि त्यांचे सहकारी गाडीतून मंदिराकडे न येता पायी चालत आले.

निवडक मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी देवाचे दर्शन घेतले. अवघ्या १० मिनिटात दर्शन घेतले. मंदिर समितीने त्यांचा सत्कार केला. त्यांच्या सोबत मा.आ.शंकर धोंडगे, माणिक कदम,भगिरथ भालके हे होते.



### विठ्ठल मंदिर परिसरात पोलिसांचा बंदोबस्त

केसीआर यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात विठ्ठल मंदिराच्या व्हीआयपी गेटवर महाराष्ट्र पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होति. सुरक्षेत कोणतीही चूक होणार नाही याची खबरदारी महाराष्ट्र पोलिसांकडून घेतली गेली. बीडीडीएस पथकानंही मंदीर परिसराची तपासणी केली . केसीआर यांच्या सुरक्षेची जबाबदारी महाराष्ट्र पोलिसांकडून चोख पद्धतीने करण्यात आली.

## ६५ एकर परिसरामध्ये सुमारे तीन लाख वारकऱ्यांच्या निवासाची सोय

✔ सुराज्य/पंढरपूर

यात्रेला येणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांसाठी जिल्हा प्रशासनाने ६५ एकर (भक्ती सागर) परिसरामध्ये ४९७ प्लॉटसच्या माध्यमातून मुक्कामाची सोय उपलब्ध केली आहे. या प्लॉटसच्या माध्यमातून सुमारे अडीच ते तीन लाख भाविकांची राहण्याची सोय होणार आहे.

यात्रेच्या सोहळ्यासाठी राज्यासह परराज्यातूनही लाखो भाविकांचे पंढरीमध्ये आगमन होणार आहे. यावर्षी महिला वारकऱ्यांच्या संख्येत देखील लक्षणीय वाढ होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ६५ एकर परिसरात यंदा ४९७ प्लॉटस तयार केले आहेत. दरवर्षी या प्लॉटसमध्ये दिंडी सोबत आलेले वारकरी तंबू व राहूट्या उभारून तेथे यात्रा कालावधीमध्ये मुक्कामी राहतात. यावर्षी देखील आषाढी यात्रा कालावधी मध्ये मुक्कामासाठी येणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना प्रशासनाने विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शुद्ध पिण्याचे पाणी, २४ तास वीजपुरवठा, मुबलक प्रमाणात स्वच्छतागृहे आदी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. हा परिसर स्वच्छ व दुर्गंधी मुक्त असावा याकरिता प्रशासनाच्यावतीने भाविकांसाठी सुमारे १ हजार तीनशे कायमस्वरूपी स्वच्छतागृहे तर तात्पुरती ३०० स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत. याशिवाय आठ ते दहा ठिकाणी हायमास्ट दिवे उभारण्यात आल्याने हा परिसर प्रकाशाने उजळून निघाला आहे.

## बाजीराव विहीर येथे माऊलींचा रिंगण सोहळा उत्साहात

✔ सुराज्य/पंढरपूर

बाजीराव विहीर येथे माऊलींच्या पालखी सोहळ्याचे उभे रिंगण मंगळवारी उत्साहात पार पडले.



भंडीशेगांव मुक्कामी पहाटे माऊलींची विधीवत पूजा सोहळा प्रमुख ॲड. विकास ढगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. दिवसभर माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. कांदेनवमीच्या निमित्ताने पालखी तळावर वाल्हेकरांच्या दिंडीमध्ये कांदेनवमी साजरी करण्यात आली.

सोहळ्यात वाल्हेकरांना समाजआरतीचे वेळी पंख्याचा मान असतो. वाल्ह्याचे अभियंते कृष्णाजी भगवंत मांडके यांनी निरा नदीवर स्वखर्चाने पुल बांधून माऊलींचा पालखी सोहळा जेजूरी, वाल्हे मार्गे लोणंदला नेला. त्या सेवेप्रित्यर्थ माऊलींना आरतीवेळेस वारा घालण्याचा मान मांडके यांना देण्यात आला आहे. त्यांच्यावतीने पालखी तळावर कांदेनवमी साजरी केली जाते. दुपारचे भोजन घेवून हा सोहळा शेवटच्या वाखरी मुक्कामाकडे मार्गस्थ झाला.

भंडीशेगांव येथे नवीन उड्डाण पूल झाल्याने व पोलिसांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत केल्याने वाहतूकित कोठेही अडचण आली नाही. दुपारी २.३० वाजता हा सोहळा बाजीराव विहीर येथे उभ्या रिंगणासाठी पोहोचला.

चोपदारांनी रस्त्यावरच उभे रिंगण लावून घेतले. दुपारी ३.३० वाजता अश्व धावण्यासाठी सोडण्यात आले. पुढे माऊलीचा अश्व तर मागे स्वाराचा अश्व धावत होता. टाळ मृदुंगाच्या गजरात माऊलीऽ माऊलीऽऽ नामाचा अखंड जयघोष चालू होता. अश्वांनी धावत जावून माऊलींना एक प्रदक्षणा पूर्ण करीत रथामागे २० दिंड्यांपर्यंत गेला. त्यानंतर पुन्हा रथाजवळ येवून माऊलींचे दर्शन घेतले. नारळ, प्रसाद घेवून पुन्हा तो पंढरीच्या दिशेने धावत आला. यावेळी पुंडलिक वरदा, हरि विठ्ठल असा जयघोष वैष्णवांनी केला. उभ्या रिंगणाचा सोहळा संपल्यानंतर गोल रिंगणासाठी हा सोहळा रस्त्यालगतच्या मैदानात पोहोचला.

उभ्या रिंगणानंतर बाजीराव विहीरीजवळ पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोल रिंगण तयार करण्यात आले. या आखीव रेखीव गोल रिंगणात चार वाजता माऊलींची पालखी आली . पालखीने रिंगणाला एक प्रदक्षिणा पूर्ण केली . त्यानंतर श्रीमंत उर्जितसिंह शितोळे व महादजीराजे शितोळे सरकार यांनी रिंगणाची पाहणी केली . भोपळे दिंडीच्या वारकऱ्यांने जरीपटक्याच्या ध्वजासह पाच रिंगण पूर्ण केले . त्यानंतर दोन्ही अश्व रिंगणासाठी तयार झाले. सुरूवातीला माऊलींचा व स्वाराचा अश्व रिंगणाच्या मध्यभागी आणण्यात आला. ढगाळ वातावरणात स्वाराच्या अश्वासह माऊलीच्या अश्वाने लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत नेत्रदिपक दौड करून ३ प्रदक्षणा पूर्ण केल्या.

यावेळी उपस्थितीत भाविकांनी माऊलीऽ माऊलीऽऽ नामाचा जयघोष करीत अश्वांवर खारीक, बुक्याची उधळण केली. रिंगण सोहळ्यानंतर दिंड्यादिंड्यामध्ये उडीचे खेळ रंगले.

उडीच्या खेळानंतर हा सोहळा वाखरीकडे मार्गस्थ झाला. समाज आरतीनंतर तो वाखरीत विसावला. दि.२८ जून रोजी सर्व संतांना पुढे करून सर्वात शेवटी दुपारी १ वाजता माऊलींची पालखी वाखरीतून पंढरपूरकडे विठ्ठलाच्या भेटीसाठी मार्गस्थ होणार आहे.

प्रथम पुण्यस्मरण



कै.रेणुका दत्तात्रय दुस्सा

मृत्यू दि.०७ ऑगस्ट २०२२

प्रेम देऊनी जगाला जवळ केले सर्वांना,
न उरली साथ आम्हाला, आठवण येते क्षणाक्षणाला,
कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे, अधुरे राहिले जीवन गाणे,
आता फक्त एकच उरले तुमच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहणे,
तुमच्या स्मृतींना आमची भावपूर्ण आदरांजली.

✻ शोकाकुल ✻

ॲड.सौ.के.आर.बागबान, सत्यनारायण दुस्सा, बाळकृष्ण दुस्सा, रतन गोस्वामी, अंबिका गोस्वामी, नागनाथ दुस्सा, बालु दुस्सा, अमर दुस्सा, विनायक दुस्सा

समस्त दुस्सा, गोस्वामी व बागबान परिवार



## रोटरी नॉर्थ विद्यालयात दिंडी

✔ सुराज्य/सोलापूर

**रोमारोमात भक्ती**
**अंतरंगात पंढरी**
**सावळा विठ्ठल दारी**
**पावन दमानी नगरी**

रोटरी नॉर्थ संचलित राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात अनेक संतांच्या मेळाव्यासह सुंदर दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. टाळ मृदुंगाच्या नादाने दमानी नगरी भक्तिमय झाली. परिसरातील नागरिकांनी पालखीचे स्वागत आणि पूजन केले.

महाराष्ट्राचे दैवत पंढरीचा पांडुरंग आणि त्याचा सर्वात मोठा सोहळा म्हणजे आषाढी एकादशीची वारी, या वारीचे महत्त्व आणि वारी कशी असते हे विद्यार्थ्यांना समजावे यासाठी आज शाळेत दिंडी काढण्यात आली होती. विठ्ठल रुक्मिणी, वारकरी तसेच संतांची वेशभूषा अशा विविध रंगानी आणि व्यक्तिरेखांनी दिंडी सजली होती.

प्रारंभी शाळेचे सचिव सुनील दावडा यांच्या आणि श्री माने महाराज यांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. ज्ञानोबा तुकाराम यांच्या नामगजरात दिंडी निघाली. पदाधिकारी आणि कर्मचारी वृंदानी अभंगावर ताल धरला आणि दमानी नगर परिसरात दिंडी निघाली.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ चे अध्यक्ष डॉ निहार बुरटे यांच्या हस्ते आरती करून आणि पसायदानाने दिंडीची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमास अध्यक्ष डॉ निहार बुरटे, शाळेचे सचिव सुनील दावडा, रोटे मल्लिकार्जुन अष्टगी, मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे, रेणुका पसपुलें, संध्या चंदनशिवे, विजया पिटाळकर, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, आनंद पारेकर, चिदानंद बेनुरे, सैफन बागवान, अजित पाटील,गंगाधर मदभावी, साहेबगौडा पाटील, बाबासाहेब पवार आदी उपस्थित होते.